**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ०६/११/२०१९

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती **सभा क्र -०५ बुधवार दि. १३/११/२०१९ रोजी दुपारी १.०० वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**बुधवार दिनांक -१३/११/२०१९ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ९२ | उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) तत्वावर महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान चालविण्यास देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९३ | अर्जदार मालमत्ता धारक श्री.शेख लाला बादशहा व इतर प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ बिल नं २९७ खाटीक गल्ली यांचे दि.२३/७/१९ रोजीच्या सुनावणी नुसार घरपट्टीची आकारणी केल्याने उर्वरित रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९४ | अर्जदार श्री. सुभाष नवलमल गांधी, रा. वंजार गल्ली,अ.नगर यांनी प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. २५ , बिल क्र.२६३ यांचे नळ कनेक्शन नसतांना लागलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९५ | अर्जदार श्री. मधुकर सिध्देश्वर सावेडकर,तोफखाना, अ.नगर यांनी प्र.समिती क्र. २ वॉर्ड क्र.२ बील नं.४२२७४ या मिळकतीवरील नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकारणी निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ९६ | अर्जदार श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांना बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.२८ बिल क्र.१०७२ व बिल क्र.११११ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन घरपटटी बीले येत असुन एक बील घरपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९७ | अर्जदार श्री. दिलीप मल्हारी रासकर , रा. सारसनगर ,अ.नगर यांनी बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.२८ , बिल क्र. १] Z४२८११०५१८ , २] Z४२८११०४८२ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन बीले येत असुन एक बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ९८ | अर्जदार श्रीमती कांताबाई शिवराम फुलसौंदर , यांना बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४, वॉर्ड क्र.३० या नळ कनेक्शन नसतांना येणारे पाणीपटटी बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ९९ | अर्जदार सुमन मधुकर वारे हस्ते श्री. देवेंद्र मधुकर वारे यांना रा.गुंजाळ गल्ली केडगाव,अ.नगर येथे बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.३८ , बील क्र.३४ या नळ कनेक्शन बंद असताना देखील महापालिकडून आाकरण्यात आलेल्या पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०० | अर्जदार भोग- दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे , रा. शेनश्वर सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६१ , बिल क्र.Z१६१००००३४९ या नावाने पाणीपटटी आकारणीची नोंद असुन देखील नावे बिल क्र. Z१६१०६४९२ वरील येणारी घनकचरा, पाणीपटटी व २% दंडात्मक कराची रक्कम संपुर्ण निर्लेखित करणेचा ऑफिस रिपोर्ट |
| १०१ | अर्जदार मालमत्ताधारक अविनाश अमेचर भातांबरेकर, रा. सेल्स टॅक्स कॉलनी, पा.ला. रोड,अ.नगर येथे प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६२ , बिल क्र.Z१६२०६६१९३(६२-८१४) या नावाने मालमत्ताकर व पाणीपटटी कर आकारणीची नोंद असुन देखील यांच्या नावे बिल क्र.Z१६२०६६६२५(१२०७) वरील येणारी मालमत्ताकर , पाणीपटटी व २% दंडात्मक करासह संपुर्ण रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १०२ | अर्जदार डॉ. देवदत गोविंद केतकर, रा. फायनल प्लॉट नं.१७६, टिळक रोड,अ.नगर यांना वॉर्ड क्र.२२ ,बिल क्र. Z४२२१०५६८४ या वाणिज्य प्रमाणे आकारलेली पाणीपटटी कमीकरणेबाबत व्यावसायिक दराने आकारण्यात आलेली पाणीपटटी रद्द करून निवासी दराने पाणीपटटी सुधारित बील देण्यांची व्यवस्था करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १०३ | अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.४४६ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव स.नं.१८३/१ ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये ३ वर्षाचा २/३ परतावा मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १०४ | वॉर्ड नं.२ , बील क्र.९३८,९४०,९४१ या बिलांबाबत समक्ष स्थळ पाहणी केली असता एकुण ८ प्लॉट व १ दुकान (गाळा) असे ९ मिळकती आढळून आलेल्या कर आकारणी बिले व रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०५ | अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतात्रिक कर्मचारी यांची दि.१३/०९/२०१९ रोजी मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १०६ | नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ ई -निविदा क्र.२०७८ या निविदेच्या मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १०७ | अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) योजनेतील विकास कामांकरीता प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणूक करणेबाबत ई - निविदा क्र.२०९७ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १०८ | ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १०९ | मा.सौ. रिता शैलेश भाकरे, नगरसेविका यांचे दि.२६/८/२०१९ रोजीचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा बोल्हेगाव व नागापूर या भागामध्ये बससेवा सुरू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११० | श्री. कैलास प्रभाकर मडके, सहाय्यक ग्रंथपाल यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणेबाबत. |
| १११ | श्री. राजेंद्र जगन्नाथ शिरसाठ, मुख्य लिपिक यांचा शिक्षा माफीचे अपीलाबाबत |
| ११२ | श्री. शंकर उत्तम मिसाळ, फ.फा. सब. ऑफीसर यांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) नुसार शिस्तभंग कारवाई प्रकरणी झालेल्या शिक्षेविरूध्द अपिल अर्जाबाबत |
| ११३ | अर्जदार मालमत्ताधारक श्री.अशोक व प्रकाश माधवराव कुक्कडवाल रा.सर्जेपुरा प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र. २६ , बिल क्र.१८२ या नावाने मालमत्ताकर नोंद असुन सदर जागेचे बांधकाम क्षेत्र २४.४२ चौ.मी. व ओपन जागेचे क्षेत्र २७९.८८ चौ.मी या प्रमाणे जागेची वस्तुस्थिती नुसार दुरूस्ती करणे व रक्कम रूपये ५६३३०/- निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ११४ | अर्जदार मालमत्ताधारक श्री.अशोक व प्रकाश माधवराव कुक्कडवाल रा.सर्जेपुरा प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र. २६ , बिल क्र.१८१ या नावाने मालमत्ताकर नोंद असुन सदर जागेचे बांधकाम क्षेत्रा मध्ये निवास क्षेत्र २७.७९ चौ.मी., वाणिज्य क्षेत्र ३५.७० व ओपन जागेचे क्षेत्र २३५.११ चौ.मी या प्रमाणे जागेची वस्तुस्थिती नुसार दुरूस्ती करणे व रक्कम रूपये २४९३१९/- निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- विषय क्रमांक- ९२ ते ११४ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९२ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) तत्वावर महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान चालविण्यास देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिकेचे महालक्ष्मी उदयान व सिध्दीबाग उदयान यावास्तु असुन सिध्दीबाग उदयान शहराच्या दृष्टीने मध्यवर्ती भागात असल्याने नागरिकांच्या लहान मुलांच्या खेळण्यासाठी व मनोरंजनासाठी उपयुक्त असे उदयान आहे. तथापी जेष्ठ नागरिक व लहान मुलांचे समाधान होईल अशा प्रकारचे वातावरण उपलब्ध करून देणे मनपास जिकरीचे होत आहे. तसेच महालक्ष्मी उदयान हे देखील महत्वापुर्ण उदयान असुन उपलब्ध जागा तसेच उपनगरासाठी मध्यवर्ती असलेली वास्तु आहे. तथापी येथील उदयान प्रकल्पाच्या माध्यमातुन पुरेसे समाधनकारक वातावरण उपलब्ध होत नाही. मनपाच्या दृष्टीने शहर वासियांच्या उदयानाच्या सुविधेबाबत अपेक्षा उंचावलेल्या आहेत. महानगरपालिकेकडे जागा,खेळण्या,वास्तुची देखभाल, नियुक्ती केलेल्या कर्मचा-यांचा आस्थापना खर्च, विदयुत खर्च करून देखील बाग सुधारणा व अल्हाददायक वातावरण निर्मिती तुलनेमध्ये कमी प्रमाणात उपलब्ध होत आहे.,

मनपा कर्मचारी वर्ग मा.न्यायालयाच्या आदेशान्वये कायम झालेले कर्मचारी वारसा / अनुकंपा यान्वये नियुक्त झालेले कर्मचारी यांना बाग सुधारणा, झाडे फुले विकसीत करणे त्यांची जोपासणा करणे, मोकळया भागात लॉन लावणे, जंतुनाशक फवारणी करणे याशास्त्रोक्त कामाचा अनुभव नसल्याने बराचशा कर्मचारी वर्ग अकुशल असल्याने बाग सुधारणाकामी अडचणी येतात.

यास्तव महानगरपालिकेच्या माध्यमातुन दोनही उदयान खाजगीकरणातुन विकसीत करण्याबाबत निर्णय झाल्यास कर्मचारी वर्ग इतर कामासाठी मोठया प्रमाणात उपलब्ध होईल तसेच विदयुत खर्च , देखभाल खर्च कमी होउन नियुक्ती केल्या जाणा-या व्यवसाय संस्थेकडून बाग सुधारणा, नवनवीन खेळण्या उपलब्ध झाल्यास नागरिक, लहानमुले यांना सदर उदयानाचा आनंद घेता येईल याप्रकारचे सुविधा देताना व्यवसाय संस्थेस नागरिकांना शुल्क अकारणीस अनुमती द्यावी लागेल.

तसेच शहरातील १] मातोश्री उदयान, विनायक नगर ,२] शाहुनगर उदयान, केडगाव ,३] कपिलेश्वर उदयान, सारसनगर ,४] विद्याकॉलनी उदयान, कल्याण रोड ,५] मातोश्री उदयान, भुतकरवाडी ,६] शिवतीर्थ उदयान , भुतकरवाडी ,७] नाना नाणी पार्क , सन्मित्र कॉलनी इत्यादी उदयाने ना-नफा ना-नोआ या तत्वावर चालविण्यास देणे संयुक्तीक होईल.

तरी सिध्दीबाग उदयान ( मत्सालय व फुलराणीसह कै.बा.दे. उदयान ) व महालक्ष्मी उदयान खाजगी करणाच्या माध्यमातुन (BOT) तत्वावर ११ वर्ष कराराने व १] मातोश्री उदयान, विनायक नगर ,२] शाहुनगर उदयान, केडगाव ,३] कपिलेश्वर उदयान, सारसनगर ,४] विद्याकॉलनी उदयान, कल्याण रोड ,५] मातोश्री उदयान, भुतकरवाडी ,६] शिवतीर्थ उदयान , भुतकरवाडी ,७] नाना नाणी पार्क , सन्मित्र कॉलनी इत्यादी उदयाने ना-नफा ना-तोटा यातत्वावर तीन वर्षे कराराने चालविण्यास चालविण्यास देण्यास व त्याबाबतच्या अटी व शर्ती निश्चित करण्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्याबाबत आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त(कर) यांची अभिप्राय की, धोरणात्मक निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीची शिफारस होवून मा. महासभेकडे पाठविणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) तत्वावर महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान चालविण्यास देणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

प्र.उदयान विभाग प्रमुख श्री.लहारे :- उत्पन्न वाढीसाठी महानगरपालिका हद्दीतील उदयान बी.ओ.टी तत्वावर देणे बाबत विषय ठेवण्यात आलेला आहे.महानगरपालिकेचे सिध्दी बागउदयान महालक्ष्मी उदयान,यांचे दैनंदिन देखभाल व दुरूस्ती खर्च महानगरपालिकेस आर्थीक दृष्या परवडत नसल्याने बी.ओ.टी.तत्वावर उदयाने विकसिक कारण् व देखभाल करणे करीता देणे असल्याने विषय ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- महानगरपालिकेमार्फत सावेडी परिसरामध्ये तयार करण्यात आलेले गंगा उदयान हे काही दिवसांपुर्वी असेच बी.ओ.टी.तत्वावर चालविण्यासाठी देण्यात आलेले होते.संबंधित ठेकेदाराची उदयान चालविणे बाबतची मुदत संपुणही तोच काम पहात आहे.सदर बाबत कोणाचीही मंजूरी नसतांना गेल्या दोन वर्षा पासून काम पहात असून त्यांना महानगरपालिकेमार्फत बिल दिले जाते ते कसे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- गंगा उदयान देखभाल दुरूस्ती कामी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराच्या मुदती बाबतचा प्रस्ताव आलेला आहे.त्यावर रिपोर्ट ठेवून मंजूरी घेणेबाबत कार्यवाही चालू आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर:-गंगा उदयान मध्ये महिला व मुलींसाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था करण्यात आलेली नाही.दोन वर्ष करार संपुणही ठेकेदार कोणच्या आदेशानुसार काम करीत आहे.सदर कामाबाबत आपण त्यांना बिले देणार का?मुदत संपल्यानंतर दुस-या ठेकेदारची नियुक्ती बाबतचा प्रस्ताव का ठेवण्यात आलेला नाही?

मा.उपायुक्त (सा) श्री.पठारे :- गंगाउदयान देखभाल दुरूस्ती बाबतचा प्रस्ताव व पुढील कार्यालयीन कार्यवाहीचा प्रस्ताव करणे कामी विषय उदयान विभागाकडे हस्तांतरीत करण्यात यावा.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- गंगा उदयान येथील देखभाल दुरूस्ती चा करारनामा संपल्यानंतर संबंधित ठेकेदारांना कोणत्याही प्रकारचे देयक देण्यात आलेले नाही.

मा.श्री.सुभाष लोंढे :- कल्याण रोड येथे उदयान आहे परंतु त्याठिकाणी ओपन स्पेस आहे.उदयान म्हणून त्या ठिकाणी काहीही नाही.

मा.सभापती साहेब :- बी.ओ.टी.तत्वावर उदयाने विकसीत करतांना केल्याजाणा-या करारनाम्यामध्ये जेष्ठ नागरीकांना उदयानामध्ये फ्रि पास सुविधा तसेच सकाळ च्या वेळेमध्ये जॉगींग करीता येणा-या नागरीकांकरीता पास व्यवस्था करण्या बाबत अटी व शर्ती ठेवण्यात याव्यात.

मा.श्री.सुभाष लोंढे :- बी.ओ.टी.तत्वावर विकसीत करावयाच्या उदयानांचे प्लॉन /आराखडा दाखविण्यात यावे.महानगपालिकेच्या दैनंदिन कामाचे ठेकेघेणा-या ठेकेदारांना सदरची कामे देण्यात येवू नये.

मा.श्री.योगीराज गाडे :- महानलक्ष्मी उदयानामध्ये यापुर्वी नागरीकांच्या सोईसाठी सेफ्फी पॉईन्ट चे बांधकाम करण्यात आलेले होते.सदरचे काम आजही अपुर्ण आवस्थेत आहे.हे काम तातडीने पुर्ण करण्यात यावे.

मा.श्री.गणेश भोसले :- काही उदयाने यापुर्वी देखभाल दुरूस्ती करीता देण्यात आलेली होती.ती यादी मध्ये घेण्यात आलेली आहे.

श्री.इथापे :- सन २०१५-१६ मध्ये १३ उदयाने विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.टेंडरमध्ये संपुर्ण देखभाल दुरूस्ती करण्याकरीत देण्यात आले आहे.सन २०१६-१७ मध्ये अमृत अभियानं अंतर्गत घेण्यात आलेले आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम अंतर्गत व मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प या योजने अंतर्गत येणा-या उदयाने वगळून (BOT) तत्वावर कराराने चालविण्यास देण्यास मंजूरी देण्यांत यावी. एक वर्षा करीता उदयाने विकसीत करणे व देखभाल दुरूस्ती करीता दिलेली असतांना पुन्हा या यादीमध्ये का घेण्यात आली ? भोसले आखाडा येथील साई उदयान मध्ये वारंवार सांगुनही लाईट लावले जात नाहीत. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करा.

मागील २ वर्षापासून या उदयानाशेजारील रहिवाश्याकडून वायर टाकूण उदयानाकरिता लाईट घेतली जाते. महानगरपालिकेचे दुर्देव आहे. त्या नागरिकांचा सहनशक्तीचा अंत पाहु नका तात्काळ मिटर बसवावे अन्यथा मला मा.आयुक्त साहेबांच्या दालनासमोर कोणतीही पुर्व कल्पना न देता उपोषण करावे लागेल व त्याचा सर्व जबाबदारी प्रशासनावर राहील.

मा.श्री. गणेश भोसले :- उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) तत्वावर उदयाने कराराने चालविण्यास देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.अविनाश घुले :-प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम अंतर्गत व मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प या योजने अंतर्गत येणा-या उदयाने वगळून ऑफिस रिपोर्ट मान्य करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- भोसले आखाडा येथील साई उदयान मध्ये विदयुत व्यवस्थेकरिता तात्काळ मिटर बसविण्याची कार्यवाही करावी. व प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम अंतर्गत व मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प या योजने अंतर्गत येणा-या उदयाने वगळून ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या नुसार अहमदनगर महानगरपालिकेची उदयाने उत्पन्नाच्या वाढीसाठी शहरातील सिध्दीबाग उदयान ( मत्सालय व फुलराणीसह कै.बा.दे. उदयान ) व महालक्ष्मी उदयान खाजगी करणाच्या माध्यमातुन (BOT) तत्वावर ११ वर्ष काराराने व १] मातोश्री उदयान, विनायक नगर ,२] शाहुनगर उदयान, केडगाव ,३] कपिलेश्वर उदयान, सारसनगर ,४] विद्याकॉलनी उदयान, कल्याण रोड ,५] मातोश्री उदयान, भुतकरवाडी ,६] शिवतीर्थ उदयान , भुतकरवाडी ,७] नाना नाणी पार्क , सन्मित्र कॉलनी इत्यादी उदयाने ना-नफा ना- तोटा तत्वावर खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) तत्वावर ३ (तीन) वर्षे कराराने चालविण्यास देण्यास त्याबाबतच्या अटी व शर्ती निश्चित करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. धोरणात्मक निर्णय घेणेकामी अखेर मंजूरीस्तव मा.महानगरपलिका सभे पुढे शिफारस करण्यात येत आहे.

**ठराव :-** प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम अंतर्गत व मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहमदनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प या योजने अंतर्गत येणा-या उदयाने वगळून ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या नुसार अहमदनगर महानगरपालिकेची उदयाने उत्पन्नाच्या वाढीसाठी शहरातील सिध्दीबाग उदयान ( मत्सालय व फुलराणीसह कै.बा.दे. उदयान ) व महालक्ष्मी उदयान खाजगी करणाच्या माध्यमातुन (BOT) तत्वावर ११ वर्ष काराराने व १] मातोश्री उदयान, विनायक नगर ,२] शाहुनगर उदयान, केडगाव ,३] कपिलेश्वर उदयान, सारसनगर ,४] विद्याकॉलनी उदयान, कल्याण रोड ,५] मातोश्री उदयान, भुतकरवाडी ,६] शिवतीर्थ उदयान , भुतकरवाडी ,७] नाना नाणी पार्क , सन्मित्र कॉलनी इत्यादी उदयाने ना-नफा ना- तोटा तत्वावर खाजगी करणाच्या माध्यमातून (BOT) तत्वावर ३ (तीन) वर्षे कराराने चालविण्यास देण्यास त्याबाबतच्या अटी व शर्ती निश्चित करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. धोरणात्मक निर्णय घेणेकामी अखेर मंजूरीस्तव मा.महानगरपलिका सभे पुढे शिफारस करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :-मा.श्री. गणेश भोसले सही /-

अनुमोदकः- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९३ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ता धारक श्री.शेख लाला बादशहा व इतर प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ बिल नं २९७ खाटीक गल्ली यांचे दि.२३/७/१९ रोजीच्या सुनावणी नुसार घरपट्टीची आकारणी केल्याने उर्वरित रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक २ शहर वसुली विभाग

प्रभाग समिती क्र. २ अंतर्गत शहर वसुली विभागाकडून विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येते की, वॉर्ड नं.१३ बिल नं.२९७ (Z२१३०८४५१२) घर नं.३८९५, सि.स.नं.५२४२ चे मालमत्ता धारक श्री. शेख लाला बादशहा , श्री. शेख रफिक बादशहा, श्री. शेख मन्सुर हाजी अकबर अली खाटीक गल्ली,अ.नगर यांनी पुर्वीचे जुने बांधकाम पाडून संपुर्ण नवीन बांधकाम केलेले आहे. सदरची बांधकाम परवानगी ९१२ दि.१३/०२/२०१२ ची आहे. त्यानुसार वसुली विभागाने दि.१९/०१/२०१९रोजी कर आकारणी करीता संपुर्ण जागेचे मोजमाप घेवून मा.सहा.कर.निर्धारण अधिकारी यांजकडे आकारणी करीता प्रकरण ठेवले सदर बांधकाम परवानगी नुसार दि.०१/०४/२०१५ पासुन सदर मालमत्तेवर आकारणी करण्यात आलेली आहे.त्यानुसार मालमत्ता धारक यांना मालमत्ता कराची सुधारित नोटीस महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण ८ कराधान नियम १५(२) अन्वये नोटीस क्र.५२७९ दि.२५/०३/२०१९ ने देण्यात आलेली होती. सदर नोटीसी मध्ये करयोग्य मुल्य ३७,१४०/- एवढे आहे.

परंतु मालमत्ता धारक यांना दि.०१/०४/२०१५ पासुन केलेली आकारणी मान्यत नसल्याने दि.०८/०७/२०१९ रोजी शहर वसुली कडे अर्ज देवून कळविले आहे की, सदरची आकारणी मान्य नसून दि.०१/०४/२०१८ पासून आम्हाला घरपटटीची आकारणी करण्यात यावी. त्यानुसार मालमत्ता धारक श्री.शेख लाला बादशहा , शेख रफिक बादशहा, शेख मन्सुर हाजी अकबर अली यांना वसुली जा.क्र.१७१ दि.१६/७/२०१९ ने मा.उपायुक्त (कर) यांचे समोर दि.२३/०७/२०१९रोजी सकाळी ११.०० वा. सुनावणी करीता (हेरिंग) बोलाविण्यात आले होते.

दि.२३/०७/२०१९ रोजी सुनावणी दरम्यान मालमत्ता धारक यांनी दि.०१/०४/२०१५पासून केलेली आकारणी मान्य नाही तरी दि.०१/०४/२०१८ पासून आकारणी करावी आमचे बांधकाम सन २०१८ मध्ये पुर्ण झालेले असुन पुरावा म्हणून अग्रीमेंट (करारनामा) व अभियंता यांचे पुर्नत्वाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी दि.०१/०४/२०१८पासून घरपटटीची आकारणी करावी असे मा.उपायुक्त (कर) यांजसमोर लिहून दिलेले आहे. त्यानुसार मा.उपायुक्त (कर) यांनी

१] सर्व कागदपत्रे व पुरावे अवलोकनार्थ घेवून एप्रिल २०१८ ते मार्च २०२० पर्यत बिलाची घरपटटीची रक्कम भरून घ्यावी.

२] सन २०१५ ते दि.३१/०३/२०१८ पर्यतची रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करावी. असे दि.२३/०७/२०१९ रोजी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मालमत्ता धारक यांना इकडील जा.क्र.१७५ दि.३०/०७/२०१९ ने दि.०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२० अखेर घरपटटी रक्कम रू.६६,५४५/- त्वरीत भरणे बाबत व दि.०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१८ पर्यतची रक्कम निर्लेखित करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य होईल असे कळविले होते.

त्यानुसार मालमत्ता धारक यांनी पा.क्र.AS/४३८३६ दि.२९/०८/२०१९ अन्वये रू.६६,५४५/- ऐवढी रक्कम भरलेली आहे.त्यानुसार दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१८ अखेरची उर्वरित रक्कम रू.६६,६५९/- निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

सोबत-१. सिन्गल डबल फॉर्म ,२. नोटीस क्र.५२७९ दि.२५/०३/२०१९ , ३. सुनावणी नोटीस जा.क्र. १७१ दि.१६/०७/२०१९ ,४. सुनावणी फॉर्म ,५. शहर वसुली जा.क्र.१७५ दि.३०/०७/२०१९ चे पत्र,६. घरपटटी भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत ,७. बांधकाम परवानगी ,मंजुर नकाशा व अभियंता यांचे पुर्नत्वाचे प्रमाणपत्र

यावर प्रभाग अधिकारी क्र.२ यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर सहा.क.मु.नि.क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार बांधकाम केव्हा पूर्ण केले व त्याबाबत पुरावे सादर केल्याने १/४/२०१५ ते ३१/०३/२०१८ पर्यतची रक्कम वसुल होणारी नसल्याने महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, T-२ वरील "अ" मधील रक्कम सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक यांचे अभिप्रायानुसार निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पाठविणेस मान्यता देणेस हकरत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समितीमध्ये ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक मालमत्ता धारक श्री.शेख लाला बादशहा व इतर प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ बिल नं २९७ खाटीक गल्ली यांचे दि.२३/७/१९ रोजीच्या सुनावणी नुसार घरपट्टीची आकारणी केल्याने उर्वरित रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक मालमत्ता धारक श्री.शेख लाला बादशहा व इतर प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ बिल नं २९७ खाटीक गल्ली यांचे दि.२३/७/१९ रोजीच्या सुनावणी नुसार घरपट्टीची आकारणी केल्याने उर्वरित रक्क्रम निर्लेखित करणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार मालमत्ताधारक मालमत्ता धारक श्री.शेख लाला बादशहा व इतर प्रभाग समिती क्र.२ वॉर्ड क्र.१३ बिल नं २९७ खाटीक गल्ली यांचे दि.२३/७/१९ रोजीच्या सुनावणी नुसार घरपट्टीची आकारणी केल्याने उर्वरित रक्कम निर्लेखित करणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९४ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. सुभाष नवलमल गांधी, रा. वंजार गल्ली,अ.नगर यांनी प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. २५ , बिल क्र.२६३ यांचे नळ कनेक्शन नसतांना लागलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ४ बुरूडगाव रोड

वॉर्ड नं.२५ चे लिपिक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, श्री. सुभाष नवलमल गांधी, रा. वंजार गल्ली,अ.नगर (कायनेटीक चौक) यांनी दि.१/३/२०१७ रोजी अर्ज देउन कळविले आहे की, नळ कनेक्शन नसतांना लागलेली पाणीपटटीचे बिल रद्द करावे. वॉर्ड नं.२५ बिल नं.२६३ हे आहे.

आलेला अर्ज मनपा फिटर यांजकडे स्थळपहाणी करीता पाठविला असता मनपा फिटर यांनी दि.६/३/२०१७ रोजी समक्ष स्थळ पहाणी करून सदर मिळकतीवर नळ कनेक्शन नसल्याबाबत अहवाल सादर केला आहे.

अर्जदाराकडे सन १९९६- ते २००४` २००५पर्यत रू.६३२४०/- पाणीपटटी तसेच त्यावर लागलेली शास्ती वसुल न होणारी रक्कम महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ चे कलम १५२ प्रमाणे निर्लेखित करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरीस ठेवणेस आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली , लिपिक , कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व कर निरीक्षक यांचे प्रस्तावीतनुसार पुढील कार्यवाहीस्तव.

यावर सहा.क.मु.नि.क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार नळजोड नसतांना पाणीपटटीची आकारणी झालेली पाणीपटटीची आकारणी झालेली होती. समक्ष शाखा अभियंता यांनी पहाणी करून नळजोड नसल्याबाबत अहवाल सादर केला आहे. त्यानुसार १८-१९ अखेर रू.६३२४०/- ही पाणीपटटीची रक्कम वसुल होणारी नसल्याने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,पृष्ठ क्र.३ वरील अर्जदाराचा अर्ज दि.२७/१/२००५ मध्ये स.नं.११२/२०/१मधील प्लॅट नं.५,६,७,८ मध्ये ४ नळ कनेक्शन आहेत व ते प्लॅट ज्या ४ जणांना विकले आहेत त्यांचीही नावे आहेत त्या नावानुसार व प्लॅट नुसार (सर्व्हे नंबर मधील) संबंधीताच्या नावावर नळ कनेक्शनची बिले जात आहेत का ? असलेल त्याबाबत खात्री करून सदर बिले अवलोकनार्थ ठेवून त्यामधील मागणी व वसुलीबाबत अहवाल सादर करावा त्यानुसार एकाच अर्जदारांच्या अर्जानुसार एकाच प्रॅापर्टीला डबल बिले जात आहेत किंवा कसे याबाबत अहवाल सादर करावा.

यावर वसुली लिपिक, कर निरीक्षक , प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, फेरसादर पान नं.३ वरील अर्जदाराचा अर्ज दि.२०/१/२००५ मध्ये स.नं.१२२/२०/१ मधील प्लॉट नं.५,६,७,८ मध्ये ४ नळ कनेक्शन आहेत ते मालमत्ता धारकाचे नाव बिल नंबर, खालीलप्रमाणे

| बिल नं. | प्लॉट नं. | मालमत्ता धारकाचे नाव |
|---|---|---|
| २६४ | ०५ | गणेश चांदमल कोठारी |
| २६७ | ०६ | राधेश्याम हिरालाल झंवर |
| २६६ | ०७ | कोठारी |
| २६५ | ०८ | अभय मनसुखलाल कोठारी |

संबंधीताचे नावावर नळ कनेक्शनची बिले जात आहेत त्याची बिले सोबत जोडलेली आहे. संबंधीत मालमत्ता धारकानी सन २०१९-२०२० अखेर मालमत्ता कर, इतरकर व पाणीपटटीचा संपुर्ण भरणा केलेला आहे. तसेच एकच मालमत्तावर डबल बिलाची नोंदन तसेच डबल बिल जात नाही. येणेप्रमाणे अहवाल सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाचा अहवाल अवलोकनार्थ घेवून पाणीपटटीची रक्कम व त्यातील शास्तीची रक्कम निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी इकडील शिफारस मा.आयुक्तांची मान्यता घेवून सादर करावा.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीमध्ये ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. सुभाष नवलमल गांधी, रा. वंजार गल्ली,अ.नगर यांनी प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. २५ , बिल क्र.२६३ यांचे नळ कनेक्शन नसतांना लागलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- श्री. सुभाष नवलमल गांधी, रा. वंजार गल्ली,अ.नगर यांनी प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. २५ , बिल क्र.२६३ यांचे नळ कनेक्शन नसतांना लागलेली पाणीपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** श्री. सुभाष नवलमल गांधी, रा. वंजार गल्ली,अ.नगर यांनी प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. २५ , बिल क्र.२६३ यांचे नळ कनेक्शन नसतांना लागलेली पाणीपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९५ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. मधुकर सिध्देश्वर सावेडकर,तोफखाना, अ.नगर यांनी प्र.समिती क्र. २ वॉर्ड क्र.२ बील नं.४२२७४ या मिळकतीवरील नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकारणी निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक २ शहर वसुली विभाग

संदर्भ- दि.१५/५/२०१९ रोजीचा अर्ज

प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली वॉर्ड क्र.२ वसुली लिपिक यांजकडून प्रस्ताव देण्यात येतो की, वॉर्ड क्र.२ मधील बिल नं.४२२७४ श्री. मधुकर सिध्देश्वर सावेडकर , सि.स.नं.४५०, ठाकुर गल्ली, अ,नगर नावे वसुली अभिलेखात नोंद आहे. अर्जदार मधुकर सिध्देश्वर सावेडकर यांनी संदर्भान्वये महानगरपालिकेकडे यापुर्वी दि.९/७/२०१२ व दि.११/५/२०१८ रोजी अर्ज दाखल करून नळ कनेक्शन नसले बाबत कळविले आहे. प्रत्यक्षात नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी बिल दिलेले आहे. सदर ठिक्णी स्थळ पाहणी करून पाणीपटटी बिल रद्द करणेबाबत विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी दि.१५/५/२०१९रोजी पुनश्च अर्ज दाखल करून पाणीपटटी बिल कमी करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जानुसार पाणीपुरवठा फिटर यांनी दि.२६/७/२०१९ रोजी स्थळ पाहणी केली असता नळ कनेक्शन आढळुन येत नाही असा अभिप्राय दिलेला आहे. मालमत्ता धारक यांनी दि.९/७/२०१२ व दि.११/५/२०१८ तसेच दि.१५/५/२०१९ अन्वये दाखल अर्जानुसार व पाणीपुरवठा फिटर यांचे समक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार मालमत्ता धारकास नळ जोडणी नसतांना आकारणी झालेली आहे तरी नळ जोडणीची झालेली आकारणी ही वसुल न होणारी असल्याने सदरची आकारणी सन २०१०-२०११ पासून रू.१५,०००/- महराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील कराधान प्रकरण ११ मधील अधिनियमातील कलम १५२ नुसार पाणीपटटी बिल निर्लेखित करणेस अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र.२ वसुली लिपिक यांचे प्रस्ताव मालमत्ताधारक यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार तसेच पा.पु. फिटर यांचे समक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार यापुर्वी दाखल केलेल्या व दि.१५/५/२०१९ रोजीचे दाखल केलेल्या अर्जानुसार सन २०१०-२०११ ते २०१९-२०२०अखेर वसुल न होणारी पाणीपटटी नमुद तरतुदीनुसार रक्कम रू.१५०००/- निर्लेखित करणेकामी मान्यतेस्तव सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.२ यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार दुरूस्तीस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार सावेडकर यांचे कडे पिण्याचे पाण्याचे कनेक्शन नसतांना पाणीपटटीची आकारणी झालेली आहे. सदर भागामध्ये फिटर यांनी समक्ष जागेची पहाणी केली असुन नळजोड नसल्याबाबत अहवाल दिलेला आहे. नळजोड नसतांना पाणीपटटी बिलाची रक्कम वसुल होणारी नसल्याने महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीतप्रमाणे अनिवासी मालमत्तेस आकारणी केलेली पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. मधुकर सिध्देश्वर सावेडकर,तोफखाना, अ.नगर यांनी प्र.समिती क्र. २ वॉर्ड क्र.२ बील नं.४२२७४ या मिळकतीवरील नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकारणी निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- श्री. मधुकर सिध्देश्वर सावेडकर,तोफखाना, अ.नगर यांनी प्र.समिती क्र. २ वॉर्ड क्र.२ बील नं.४२२७४ या मिळकतीवरील नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** श्री. मधुकर सिध्देश्वर सावेडकर,तोफखाना, अ.नगर यांनी प्र.समिती क्र. २ वॉर्ड क्र.२ बील नं.४२२७४ या मिळकतीवरील नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५

विषय क्रमांक- ९६ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांना बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.२८ बिल क्र.१०७२ व बिल क्र.११११ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन घरपटटी बीले येत असुन एक बील घरपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ४ बुरूडगांव

संदर्भ- श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांचा दिनांक १६/३/२०१९ रोजीचा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री.अनिल बाळासाहेब कचरे यांनी अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये माझी पटटी ही बील नं.१०७२ मालमत्ता क्र.Z४२८०००३०४ वर घरपटटी येत असुन ती त्याचे दुसरे बील क्र.११११ वरसुध्दा येत आहे. तरी समक्ष पाहणी करून ११११ हे बील रदद करावे. असा अर्ज सादर केलेला आहे.

याबाबत वास्तविक परिस्थिती अशी की, वॉर्ड क्र.२८ बिल क्र.१०७२ व बिल क्र.११११ असे दोन मालमत्ता कराचे बिले श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांना जात आहेत. अर्जदार हे मालमत्ता कराचे बिल क्र.१०७२ वरील कर नियमित अदा करीत आहे. तसेच या बिलावर सन २००३-२००४ मध्ये झालेल्या फेरमुल्यांकनमध्ये मोकळया जागेप्रमाणे (ओपन प्लॉटप्रमाणे) मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे ते पुढीलप्रमाणे-

मोकळी जागा ९६.९७ चौ.मी. x ३००= २९०९१/- कॅपिटल व्हॅल्यु

कॅपिटल व्हॅल्यु २९०९१ x ३% = ८७३/- करयोग्य मुल्य

सन २००३-२००४ पासुन वरीलप्रमाणे आकारणी बिल क्र.१०७२ वर करण्यात आलेली आहे व सारखीच आकारणी बिल क्र.११११ वर सन २००३-०४ पासुन करण्यात आलेली आहे. मात्र बिल क्र.११११ ची नोंद परिशिष्ट "अ" वर नसल्याचे दिसुन येत आहे. व दोन्ही मालमत्ता कराच्या बिलावर ११, इवळेनगर ,७७ असा पत्त असल्याची नोंद आहे. आकारणी केल्यापासून श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांनी दोन बिले येत असलेबाबत यापुर्वी तक्रार अर्ज केलेला दिसुन येत नाही.

तसेच अर्जदार यांनी सन २०१८-२०१९ मध्ये बिल क्र.१०७२ वरील मालमत्ता कराची बाकी पावती क्र.AS /६२८०३ दि.१६/३/२०१९ अन्वये रू.७,४४९/- इतकी रक्कम अदा केलेली आहे.

त्यामुळे वॉर्ड क्र.२८ बिल क्र.११११ हे बिल डबल (दुबार) झाल्यामुळे महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण ८ कराधान नियम कलम २०(फ) नुसार सदरचे बिल रद्द करणेस्तव आदेशार्थ सादर. येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर प्रभाग समिती क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक , कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार कार्यवाहीस सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार एका मालमत्ताचे दोन बिले जनरेट झाली आहेत त्यातील मालमत्ता क्र.Z४२८११०५५५ डबल असल्याने रद्द करणे आवश्यक आहे ही मालमत्ता डबल असल्या रद्द करण्यास हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, परिशिष्ट "अ" वरील जुना मालमत्ता क्र.२८/११११ कोणाच्या नावे आहे याची तपासणी करून सादर करावे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर वॉर्ड क्र.२८/११११ वरील मिळकती मालमत्ता क्रमांक या बिलाबाबत परिशिष्ट अस्तीत्वात नसून १०७२ हे मुळ बिल असून वॉर्ड क्र.२८ मधील बिल क्र.११११ हे दुबार बिल येत असून सदरील मुळ बिल क्रमांक १०७२ हे अस्तीत्वात असल्याने दुबार बिल क्र.११११ हे बिल रद्द करणेस आदेशार्थ सादर.

यावर वसुली क्लार्क यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, दुबार बिल नं. २८/११११ यावरील आजपर्यतची जी रक्कम आहे २०१९-२० या सालामधील त्या रक्कमेचा उल्लेख करून सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.आयुक्त यांचेमार्फत मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करावा व त्यानंतर बिल नं.२८/११११ हे रद्द करणेत यावे.

यावर कर निरीक्षक , प्रभाग समिती क्र.४ यांचा अभिप्राय की, फेरसादर वॉर्ड नं.२८/११११ या मिळकती वरील थकबाकी सप्टेंबर २०१९ अखेर रूपये ९३६९/- असून सदरील थकबाकी निर्लेखित करणेस आदेशार्थ सादर. / अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांना बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.२८ बिल क्र.१०७२ व बिल क्र.११११ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन घरपटटी बीले येत असुन एक बील घरपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांना बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.२८ बिल क्र.१०७२ व बिल क्र.११११ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन घरपटटी बीले येत असुन एक बीलावरील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री. सुनिल बाळासाहेब कचरे व श्री. अनिल बाळासाहेब कचरे यांना बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.२८ बिल क्र.१०७२ व बिल क्र.११११ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन घरपटटी बीले येत असुन एक बीलावरील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९७ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. दिलीप मल्हारी रासकर , रा. सारसनगर ,अ.नगर यांनी बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.२८ , बिल क्र. १] Z४२८११०५१८ , २] Z४२८११०४८२ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन बीले येत असुन एक बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ४ बुरूडगाव रोड

वॉर्ड नं.२८ चे लिपिक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, अर्जदार श्री. दिलीप मल्हारी रासकर , रा. सारसनगर यांनी इकडेस अर्ज देउन कळविले की, त्यांचे सारसनगर भागात मोकळी जागा आहे. सदर मालमत्तेचे त्यांना दोन बील येत आहे. त्यांनी सदर मालमत्तेचे त्यांना दोन बील येत आहे त्यांनी अर्जात नमुद केले की माझा एकच ओपन प्लॉट आहे तरी आपले रेकॉर्डला झालेली डबल नोंद करणेत यावी जेणेकरून मला मालमत्ता कराचा भरणा करता येईल याप्रमाणे अर्ज दिलेला आहे.

श्री. दिलीप मल्हारी रासकर यांचे मोकळया जागेची नोंद सन २००३-२००४ चे रिव्हीजन झालेली आहे. सदर मिळकतीची समक्ष पाहणी केली असता सदर मालमत्ता ही मोकळी जागा या स्वरूपात आहे. सदर मिळकतीचे करयोग्यमुल्य रू.१५८०/- एवढे आहे सन २००३-२००४ सली झालेल्या रिव्हीजनमध्ये श्री. दिलीप मल्हारी रासकर यांची ओपन प्लॉट म्हणुन दुबार नोंद घेतलेली आढळते त्यांचे बिल नं. अनुक्रमे १] Z४२८११०५१८,२]Z४२८११०४८२ हे आहे परिशिष्ठ अ ला मोकळया प्लॉटचे क्षेत्र १७५.५० चौ.मी. एवढे आहे. अर्जदाराने बिल क्र.Z४२८११०५१८ वरील मालमत्ता कराचा भरणा सन २०१५-२०१६ अखेर केलेला आहे. ओपन प्लॉटची दुबार नोंद झाले बाबतची परिशिष्ठ अ बिले सोबत जोडलेली आहे.

सबब अर्जदाराचे अर्जानुसार बिल क्र.Z४२८११०५१८ वरील नोंद कायम ठेवुन बिल क्र. Z४२८११०४८२ ची नोंद रद्द होणेस महाराष्ट्र मनपा अधि. १९४९ मधील कराधान प्रकरण ८ नियम २० (१) (क) नुसार मान्यता मिळावी ही विनंती.

येणेप्रमाणे वसुली लिपिक, कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक , कर निरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील कराधान प्रकरण ८ नियम २०(१) (क) नुसार सबब बिल रद्द होणेस मान्यतेस सादर.

यावर सहा.मु.नि.तथा संग्राहक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार एका मिळकतीचे दोन वेगवेगळे मालमत्ता कराचे बिले जनरेट झाली आहे. पा.क्र.Z४२८११०५१८ कायम ठेवुन पा.क्र.Z४२८११०४२८२ ही मिळकतीची होणारी आकारणी रद्द करून त्यावरील कराची रक्कम वसुली होणारी नसल्याने महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीतप्रमाणे मान्य "अ" नुसार विहित पध्दतीने कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव दाखल करावा.

यावर वसुली लिपिक , कर निरीक्षक , प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, सादर मालमत्ता धारक श्री.दिलीपी मल्हारी रासकर यांचे मालमत्तेची झालेली डबल नोंद बिल नं.Z४२८११०४८२ वर सन २०१९/२०२० अखेर रू.१८१४४/- एवढी थकबाकी आहे. सदर रक्कम वसुल होणारी नसल्याने महाराष्ट्र मनपा अधि. कलम १५२ नुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मान्यतेस पाठवणे बाबत आदेशार्थ सादर./अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती कडे उपरोक्त 'अ' नुसार प्रस्ताव पाठविणेकामी मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. दिलीप मल्हारी रासकर , रा. सारसनगर ,अ.नगर यांनी बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.२८ , बिल क्र. १] Z४२८११०५१८ , २] Z४२८११०४८२ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन बीले येत असुन एक बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- श्री. दिलीप मल्हारी रासकर , रा. सारसनगर ,अ.नगर यांनी बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.२८ , बिल क्र. १] Z४२८११०५१८ , २] Z४२८११०४८२ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन बीले येत असुन एक बीलावरील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री. दिलीप मल्हारी रासकर , रा. सारसनगर ,अ.नगर यांनी बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४ , वॉर्ड क्र.२८ , बिल क्र. १] Z४२८११०५१८ , २] Z४२८११०४८२ चे ओपन प्लॉटचे एकच मिळकतीचे दोन बीले येत असुन एक बीलावरील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९८ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्रीमती कांताबाई शिवराम फुलसौंदर , यांना बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४, वॉर्ड क्र.३० या नळ कनेक्शन नसतांना येणारे पाणीपटटी बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ४ बुरूडगांव

संदर्भ- दि.४/५/२०१७ , दि.१६/५/२०१८ रोजीचे अर्ज

प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड नं.३० चे वसुली लिपिक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, वॉर्ड क्र.३० मध्ये कांताबाई शिवराम फुलसौंदर बुरूडगाव रोड या नावे संगणक पाणीपटटी नोंद असुन कांताबाई शिवराम फुलसौंदर यांनी संदर्भानुसार मनपाकडे अर्ज दाखल करून कळविले आहे की, मी फुलसौंदर चाळ माणिकनगर येथे रहात वॉर्ड क्र.३० मध्ये माझे घर नसतांना पाणीपटटी बिल देण्यात येते. माझे घर वसुली वॉर्ड नं.२१ मध्ये आहे. तरी मला वॉर्ड नं.३० मधील देण्यात येणारे पाणीपटटी बिल रद्द करणेबाबत विनंती केलेली आहे.

अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार वॉर्ड नं. ३० चे वसुली अभिलेख पडताळणी केली असता तसेच संपुर्ण वॉर्ड मध्ये तपासणी केली असता अर्जदार यांचे नावे नोंद आढळुन येत नाही. अर्जदार यांनी अर्जात नमुद केले प्रमाणे वॉर्ड नं.२१ वसुली अभिलेख तपासणी केली असता तसेच खात्री करून संबंधीत वॉर्ड लिपिक यांचेसह समक्ष स्थळ पहाणी केली असता अर्जात नमुद ठिकाणी वास्तव्यास असल्याचे आढळुन आलेले आहे.

तथापी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार व समक्ष स्थळपहाणी व वसुली अभिलेखा तपासणीअंती वॉर्ड नं.३० मधील पाणीपटटी नोंद सन २०१८-१९ अखेर असणा-या थकबाकीसह रू.५७३१४/- महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर कर निर्लेखित करणे बाबत तरतुद असुन उक्त तरतुदीनुसार सदरचे बिल रद्द करणे कामी मा.स्थायी समिती पुढे मान्यतेस्तव ठेवणेस अहवाल सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र .३० चे वसुली यांचे प्रस्तावानुसार तसेच समक्ष स्थळ पहाणी व वसुली अभिलेख पडताळणी नुसार मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा. प्रभाग अधिकारी क्र. ४ यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र. ३० चे वसुली मदतनीस / करनिरीक्षक यांचे प्रस्तावानुसार महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तरतुद असुन उक्त तरतुदीनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, पृष्ठांकनासह फेरसादर करा.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर प्रस्तु प्रकरणी मा. सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांनी दि.८/१०/२०१८ आदेशीत केले प्रमाणे प्रकरण पुष्ठाकंन देण्यात आलेले आहे सविनय सादर.

यावर यावर सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, नळ फिटर व शाखा अभियंता यांचे नळ खंडीत करण्याचे पत्र घ्यावे.

यावर यावर यावर सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, सन २००३-०४ चे टाचण रजिस्टर सादर करावे.

यावर कर निरीक्षक , प्रभाग समिती क्र.४ यांचा अभिप्राय की, सादर सन २००३-०४ चे अभिलेख आढळुन येत नसल्याने सदरील प्रकरणाबाबत फीटर यांच्या समक्ष पाहणी अहवालाप्रमाणे मालमत्ता कराच्या अभिलेखात संबंधीत मालमत्ता धारकांच्या नावाची नोंद आढळुन येत नाही त्यामुळे अधिनियम १५२ कलमान्वये सदरील बिल निर्लेखित करणेस सादर सप्टेंबर २०१९ अखेर बाकी रूपये ६६१९३/-

यावर सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार सदर मालमत्ते नळ जोड नसतांना पाणीपटटीची आकारणी झालेली आहे. ती नळजोड कमी करून पाणीपटटीची

रक्कम वसुल होणारी नसल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम १५२नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने पाणीपटटीची रक्कम निर्लेखित करणेसाठी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. /अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, पुर्वपृष्ठावरील "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, या घरात नळ कनेक्शन आहे का ?

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर सदरील प्रकरणामध्ये पाणीपुरवठा विभागामध्ये व पाणीपुरवठा विभागामार्फत नळ जोडणी करण्यात येत असल्याने सदर प्रकरणामध्ये फिटर यांनी समक्ष पाहणी केली असल्याने सदर मिळकत धारक यांच्या नावाची नोंद अभिलेखामध्ये नळ कनेक्शनची नोंद आढळून येत नसल्या पाणीपटटी वसूल होण्याबाबत कोणतेही समाधान नसल्याने महानगरपालिका अधिनियम १५२ नुसार वसुल न होणारा कर निर्लेखित करणेस मा.स्थायी समितीस सादर (मिळकत धारकाच्या नावे नळ कनेक्शन आढळून येत नाही)

यावर कर निरीक्षक , प्रभाग समिती क्र.४ यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार संबंधीत मालमत्तेची पुनश्च पाहणी केली असता सदर घरात नळ कनेक्शन आढळून आलेले नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्रीमती कांताबाई शिवराम फुलसौंदर , यांना बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४, वॉर्ड क्र.३० या नळ कनेक्शन नसतांना येणारे पाणीपटटी बील रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्रीमती कांताबाई शिवराम फुलसौंदर , यांना बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४, वॉर्ड क्र.३० या नळ कनेक्शन नसतांना येणारे पाणीपटटी बील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्रीमती कांताबाई शिवराम फुलसौंदर , यांना बुरूडगांव प्रभाग समिती क्र.४, वॉर्ड क्र.३० या नळ कनेक्शन नसतांना येणारे पाणीपटटी बील रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ९९ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सुमन मधुकर वारे हस्ते श्री. देवेंद्र मधुकर वारे यांना रा.गुंजाळ गल्ली केडगाव,अ.नगर येथे बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.३८ , बील क्र.३४ या नळ कनेक्शन बंद असताना देखील महापालिकडून आाकरण्यात आलेल्या पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ४ बुरूडगाव रोड

विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, श्री. देवेंद्र मधुकर वारे यांनी इकडेस अर्ज देउन कळविले कि, त्यांची आई (श्रीमती सुमन मधुकर वारे) हिच्या नावे गुंजाळ गल्ली, केडगाव येथे स्थावर मिळकत आहे. सदर ठिकाणी असणारे नळ कनेक्शन बंद करणेबाबत दि.१६/१०/२०१६ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जानुसार मनपाने नळ कनेक्शन बंद केले परंतु मला अदयाप पर्यत दुरूस्त बिल आलेले नाही. याप्रमाणे अर्ज दिलेला आहे.

श्रीमती सुमन मधुकर वारे यांचे मिळकतीची नोंद वसुली वॉर्ड नं.३८ मध्ये असुन त्याचा बिल नं.३४ आहे संबंधीत मालमत्ता धारकाने दि.१६/१०/२००६ रोजी नळ कनेक्शन बंद करणेबाबत अर्ज दिलेला होता. सदर अर्जानुसार म्यु.पल फिटर यांनी नळ कनेक्शन बंद केलेले आहे. संबंधीत मालमत्ता धारकाने सदर बाबतीत लोकशाही दिनात सुध्दा दि.२६/७/२०१९ रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे. सदर तक्रार अर्जानुसार पाणीपटटी ची रक्कम निर्लेखित करून दुरूस्त बिल देण्यात यावे याप्रमाणे आदेश दिलेला आहे.

अर्जदार यांचे मालमत्तेवर आजपर्यत पाणीपटटीची थकबाकी रू.१८०००/- ऐवढी थकबाकी आहे. सदर थकबाकी वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील कलम १५२ अन्वये सदर रक्कम रू.१८०००/- निर्लेखित करणेस मा.स्थायी समितीपुढे ठेवणेत आदेश होणेस आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक , विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व विभाग प्रमुख यांनी प्रस्तावीत केलेनुसार सदरची रक्कम रू.१८०००/- महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर सहा.क.मु.नि.क.सं. अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार नळजोड नसतांना पाणीपटटीची आकारणी झालेली आहे.सदर पाणीपटटीची रक्कम वसुल होणरी नसल्याने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, १. पृष्ठ क्र.११ डील फिटर व पा.पु. क्लार्क यांचे अहवालानुसार दि.१७/१०/२००६ रोजी कनेक्शन बंद केले आहे, त्यानुसार दि.१८/१०/२००६ पर्यत पाणीपटटीच थकबाकी रक्क्म किती आहे.,२. २०१९-२०२० चे बिल अवलोकनार्थ घेतले असता पाणीपटटीची थकबाकी रू.४५००/- आहे घरपटटी पाणीपटटीसहित १९-२० चे बिल रू.१८२४०/- आहे., ३. आपण रक्कम रू.१८०००/- पाणीपटटीचे थकबाकी कोणत्या आधारे + परिगणित केली आहे.

यावर वसुली लिपिक , केडगाव विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर १] पृष्ठ क्र.३-११ वरील फिटर व पा.पु.क्लार्क यांचे अहवालानुसार दि.१७/१०/२००६ रोजी कनेक्शन बंद केले आहे. त्यानुसार दि.१६/१०/२००६ पर्यत पाणीपटटीची थकबाकी रू.६०००/- ऐवढी होती. ,२] सन २०१९-२० चे बिलात पाणीपटटीची रक्कम रू.४५००/- ऐवढी थकबाकी होती. घरपटटी व पाणीपटटी सहीत एकुण बिल रू.१८२४०/- आहे तथापी मालमत्ता धारकाचे नळ कनेक्शन दि.१७/१०/२००६ रोजी बंद केलेले आहे. मालमत्ता धारकाने पाणीपटटी पोटी सन २०१६-२०१७ पर्यत खालीलप्रमाणे पैसे भरलेले आहे.

| पावती नंबर | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| AS/५६०८४ | ०७/०३/३०१३ | ३७१/- |
| AS /४३६१० | २४/११/२०१६ | १४३२९/- |
| AS ५८०७१ | ०५/०२/२०१९ | ३०००/- |
| | एकुण- | १८०००/- |

अर्जदाराचे नळ कनेक्शन दि.१७/१०/२००६ रोजीचे बंद केलेले असल्याने वसुल केलेली पाणीपटटीची रक्कम रू.१८०००/- चे समायोजन मालमत्ताकर व इतर करात करावे लागेल. सबब आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकरी क्र.४ यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, T-२ वरील व T-३ वरील "अ" नुसार पाणीपटटीची रक्कम निर्लेखित करून ती मालमत्ता कर व इतर करामध्ये समायोजीत करणे आवश्यक आहे, त्यानुसार पाणीपटटीची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार सुमन मधुकर वारे हस्ते श्री. देवेंद्र मधुकर वारे यांना रा.गुंजाळ गल्ली केडगाव,अ.नगर येथे बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.३८ , बील क्र.३४ या नळ कनेक्शन बंद असताना देखील महापालिकडून आाकरण्यात आलेल्या पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार सुमन मधुकर वारे हस्ते श्री. देवेंद्र मधुकर वारे यांना रा.गुंजाळ गल्ली केडगाव,अ.नगर येथे बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.३८ , बील क्र.३४ या नळ कनेक्शन बंद असताना आकारण्यात आलेल्या पाणीपटटी रक्कम निर्लेखित निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार सुमन मधुकर वारे हस्ते श्री. देवेंद्र मधुकर वारे यांना रा.गुंजाळ गल्ली केडगाव,अ.नगर येथे बुरूडगाव प्रभाग समिती क्रमांक ४ , वॉर्ड क्र.३८ , बील क्र.३४ या नळ कनेक्शन बंद असताना आकारण्यात आलेल्या पाणीपटटी रक्कम निर्लेखित निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १००                                                    बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार भोग- दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे , रा. शेनश्वर सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६१ , बिल क्र.z१६१००००३४९ या नावाने पाणीपटटी आकारणीची नोंद असुन देखील नावे बिल क्र. z१६१०६४९२ वरील येणारी घनकचरा, पाणीपटटी व २% दंडात्मक कराची रक्कम संपुर्ण निर्लेखित करणेचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक १ सावेडी

सावेडी घरपटटी वसुली विभागातील वॉर्ड क्रमांक-६१ चे वसुली लिपिक यांजकडून अहवाल देण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१ बिल क्र.९३१/१ वरील भोगवटदार दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे, रा.शनेश्वर सावेडी ,अ.नगर यांनी नळजोड एक असुन पाणीपटटी कर आकारणीचे दोन बीले येत असुन एक बिल थकबाकी व शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करणेबाबत दि.२४/४/२०१८रोजी लेखी अर्जाद्वारे कळविले आहे.

अर्जदार यांच्या दि.२४/४/२०१८ रोजीच्या विनंती अर्जानुसार मनपा संगणकाची पडताळणी केली असता व अभिलेखाची पडताळणी केली असता वॉर्ड क्र.६१ बिल क्र.९३१/१ (Z१६१०६४९२३) वर अर्जदार यांच्या नावे १/२ पिण्यासाठी याप्रमाणे पाणीपटटी कर आकारणी तसेच पुन्हा पाणीपटटी नळजोड क्रमांक Z१६१००००३४९ वर १/२ पिण्यासाठी याप्रमाणे पाणीपटटी कर आकारणीची नोंद झाली असुन एकाच नळाची दोन बिले असल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील लिपिक यांनी समक्ष जागेची पाहणी केली असता भोगवटदार दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे यांना १/२ एकच नळजोड असुन त्याचा पिण्यासाठी वापर होत असल्याचे दिसुन येत आहे. तसेच पाणी पुरवठा फिटर यांचा दि.१२/६/२०१८ रोजी एकच नळजोड असल्याचे अहवाल सादर केला आहे. तसेच मालमत्ता धारक यांना नळजोड क्र.Z१६१००००३४९ ने सन २०१६-१७अखेर पा.क्र. WT /४९९ दि.३/१/२०१७ने रू.१४७१/- पाणीपटटी कराचा संपुर्ण भरणा केलेला आहे.

तरी भोगवटदार यांच्या अर्जानुसार वसुली वॉर्ड क्र.६१ बिल क्र.Z१६१०६४९२३ यावरील पाणीपटटी कर आकारणी व त्यावरील आकारण्यात येणारी शास्तीसह संपुर्ण निर्लेखित करून कायम स्वरूपी रद्द करण्यास अहवाल आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे अहवालानुसार वॉर्ड क्र.६१ मधील अ.नं ९३१/१ दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे या नावाने पाणीपटटीचे देयक असुन व Z१६१००००३४९ या बिलावर देखील पाणीपटटी येत आहे. एकाच व्यक्ती या नावात दोन बिले येत आहे. तरी बिल नं.Z१६०६४९२३ हे बिल महाराष्ट्र मनपा अधि. १९४९ कलम 'ड' प्रकरण ८ कराधान नियम २०(१) फ नुसार सदरचे बिल रद्द करणे उचित वाटते तरी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, मनपा म्यु पल फिटर यांच्या रिपोर्ट नुसार तसेच कर निरीक्षक यांचा अभिप्राया व वसुली लिपिक यांच्या प्रस्तावानुसार डबल नोंद झालेली पाणीपटटी ची नोंद कमी करणे उचित वाटते.

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, वॉर्ड क्र.६१ चे वसुली लिपिक पाणीपुरवठा ,फिटर कर निरीक्षक व प्रभाग समिती अधिकारी यांनी दि.२४/४/२०१८ व १२/६/२०१८ रोजी समक्ष स्थळ पहाणी करून सादर केलेल्या अहवाल नुसार महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील तरतुदीनुसार पाणीपटटी नोंद कमी करणे उचित वाटते आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, T-१ वर "अ" मध्ये नमूद केलेनुसार पाणीपटटी आकारणी व शास्तीची रक्कम किती आहे याची माहिती दयावी तसेच सदरची रक्कम कमी करून बिल रद्द करावयाचे झालेल ती रक्कम निर्लेखित करावी त्यानुसार निर्लेखितचा प्रस्ताव सादर करावा. तसेच तत्पूर्वी बिल क्र.Z१६१०६४९२३ वरील सर्व रक्कम थकबाकीसहीत भरून घ्यावी.

यावर मा.प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, फेरसादर उपरोक्त विषयान्वये फेरसादर करण्यात येतो की, T-१ वर "अ" मध्ये नमूद केलेल्या बिल क्र. ९३१/१Z१६१०६४९२३ वरील आकारण्यात आलेली पाणीपटटीची आकारणी ३१ मार्च २०२० अखेर रूपये १०,९२०/- रक्कम आहे व त्यावर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम रू.६६४९/- इतकी असुन एकुण रक्कम रूपये १७५६९/- इतकी आहे. तसेच मालमत्ता धारक यांच्या नावे एकच नळजोड असुन बिल क्र.Z१६१००००३४९ वरील पाणीपटटी सन २००४१०५ पासून नियमित पाणीपटटी भरत असुन त्यासर्व पावत्यांची छायंकित प्रत अर्जदार यांनी अर्जासोबत जोडले आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांने बिल क्र.९३१/१ (Z१६१०६४९२३) वरील आकारण्यात आलेली पाणीपटटी व त्यावरील शास्तीची रक्कम मान्य नसल्याबाबत लेखी अर्जाद्वारे कळविले आहे. तरी बिल क्र.९३१/१ (Z१६१०६४९२३) वरील पाणीपटटी व शास्तीची रक्कम रू.१७५६९/- संपुर्ण निर्लेखित करणेबाबत अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर./अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, T-३ वरील "अ" मधील रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेस हरकत नाही निर्णयार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार भोग- दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे , रा. शेनश्वर सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६१ , बिल क्र.z१६१००००३४९ या नावाने पाणीपटटी आकारणीची नोंद असुन देखील नावे बिल क्र. z१६१०६४९२ वरील येणारी घनकचरा, पाणीपटटी व २% दंडात्मक कराची रक्कम संपुर्ण निर्लेखित करणेचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार भोग - दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे , रा. शेनश्वर सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६१ , बिल क्र.z१६१००००३४९ या नावाने पाणीपटटी आकारणीची नोंद असुन देखील नावे बिल क्र. z१६१०६४९२ वरील पाणीपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार भोग - दत्तात्रय भाउसाहेब घोरपडे , रा. शेनश्वर सावेडी,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६१ , बिल क्र.Z१६१००००३४९ या नावाने पाणीपटटी आकारणीची नोंद असुन देखील नावे बिल क्र. Z१६१०६४९२ वरील पाणीपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०१ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक अविनाश अनंत भातांबरेकर, रा. सेल्स टॅक्स कॉलनी, पा.ला. रोड,अ.नगर येथे प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६२ , बिल क्र.z१६२०६६१९३(६२-८१४) या नावाने मालमत्ताकर व पाणीपटटी कर आकारणीची नोंद असुन देखील यांच्या नावे बिल क्र.z१६२०६६६२५(१२०७) वरील येणारी मालमत्ताकर , पाणीपटटी व २% दंडात्मक करासह संपुर्ण रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

सावेडी घरपट्टी वसुली विभाग वॉर्ड क्र.६२ चे वसुली लिपीक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.सदर वॉर्ड मधील मालमत्ता धारक श्री.अविनाश भातांब्रेकर,सेल्स टॅक्स ,पा.ला.रोडे येथे राहत असुन सदर जागेची मालमत्ता कराची दोन बिले येत असून एक बिल कायम स्वरूपी रद्द करणे बाबत अर्जदार यांनी दिनांक ८/१/२०१७ रोजी लेखी अर्जाव्दारे कळविले आहे.

सावेडी वसुली लिपीक यांनी मालमत्ताधारक यांच्या अर्जानुसार दि.२९/११/२०१७रोजी समक्ष जागेची पाहणी केली असता श्री.अविनाश अनंत भातांब्रेकर यांच्या कालकीची सेल्स टॅक्स कॉलनी पा.ला.रोड येथे एकच मालमत्ता आहे.

वसुली लिपीक यांनी सावेडी घरपट्टी वसुली विभागातील अभिलेखाची पडताळणी केली असता मालमत्ताधारक यांच्या नावे बिल क्रमांक ८१४ व बिल क्रमांक १२०७ या दोन बिलावर मालमत्ताकर आकारणीचे झालेली आहे.

अर्जदार यांनी वॉर्ड क्रमांक ६२ बिल क्रमांक ८१४ ची सन २०१७-१८ अखेर पा क्रAS/३८०१४ दिनांक ०६/१०/२०१७ रोजी रूपये २०८०/- ही संपुर्ण कराचा भरणा केले आहे.बिल क्रमांक ८१४हे कायम ठेवून बिल क्रमांक १२०७ हे थकबाकी शास्तीसह रक्कम निर्लेखित करून कायम बिल क्रमांक १२०७ हे थकबाकी शास्तीसह रक्कम निर्लेखित करून कायम स्वरूपी रद्द करून त्याची नोंद संगणकावर तसेच वसुलीच्या तत्सम रेकॉर्डवर नोंद होणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरिक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ताधारक श्री.अविनाश अनंत भातांब्रेकर यांची जुनीच मालमत्ता असुन नजर चुकीने वॉर्ड क्र.६२ मधील बि.क्र.८१४ व १२०७ यावर नोंद झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनयम १९४९ मधील कलम १५२ नुसार बिल क्र.१२०७ व त्यावर असलेल्या थकबाकी व शास्ती सह निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समिती यांच्या कडे सादर करणे उचित वाटते.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचा प्रस्ताव व कर निरिक्षक यांच्या अभिप्रायानुसार दोन ठिकाणी झालेली कर आकारणी पैकी एक कमी करणे उचित वाटते.

यावर कर निर्धारण तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,वॉर्ड क्र.६२ चे वसूली लिपीक व करनिरीक्षक यांनी दि.२९/११/२०१७ रोजी समक्ष स्थळ पहाणी करून सादर केलेल्या अहवाला नुसार व प्रभाग अधिकारी यांनी दिलेला अभिप्राय पहाता दोन ठिकाणी झालेली कर आकारणी पैकी एक आकारणी कमी करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार कार्यवाही करणे उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावीत अ प्रमाणे व करसंकलन अधिकारी यांचे अभिप्राय पहाता विभागाने उचित निर्णय घेणे योग्य होईल.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,अधिनियमातील कलम १५२ नुसार आकारणी निर्लेखित करणेस मा.स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर करणे उचित होईल,तथापी आदेशार्थ

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,स्थळ पाहाणी अहवालात कोणती दोन बिले सारखी आहेत याचा उल्लेख करा.

तसेच अ नुसार स्थयी समिती समोर कलम १५२ नुसार पस्तव सादर करा.

यावर वसुली लिपीक,कर निरीक्षक व प्रभाग अधिकारी फेरसादर उपरोक्त विषयांन्वये फेर अहवाल सादर करण्यात येतो की,समक्ष स्थळ पहाणी अहवालामध्ये मालमत्ताधारक यांच्या नावाने वॉर्ड क्र६२ बिल क्रमांक ८१४(Z१६१०६६१९३) व वॉर्ड क्रमांक ६२, १२०७(Z१६१०६६६२५) या दोन बिल क्रमांकावर अविनाश अनंत भातांब्रेकर या नावानें नोंद असून बिल क्रमांक १२०७ हे थकबाकी व त्यावर आकारण्यात येणारी २ टक्के शास्तीची रक्कम हि निर्लेखित करून बिल कायम स्वरूपी रद्द करणेबाबत सदर अहवाल आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,यथा प्रस्तावित

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,विलंबाचे काय

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,उपरोक्त विषयान्वये फेर सादर करण्यात येते की,मा.उपायुक्त (कर) साहेब यांनी सदर प्रकरणास दिनांक ६/३/१९रोजी मान्यता दिली असून चौथ्या महिन्यात लोकसभेच्या निवडणूकीच्या कामानिमित्त तसेच संबंधित वसुली लिपीक हे दिनांक १/६/ १९ रोजी मनपा सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याकारणाने सदर प्रकरणास विलंब झाला आहे.तरी सदर अहवाल मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक अविनाश अनंत भातांबरेकर, रा. सेल्स टॅक्स कॉलनी, पा.ला. रोड,अ.नगर येथे प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६२ , बिल क्र.Z१६२०६६१९३(६२-८१४) या नावाने मालमत्ताकर व पाणीपटटी कर आकारणीची नोंद असुन देखील यांच्या नावे बिल क्र.Z१६२०६६६२५(१२०७) वरील येणारी मालमत्ताकर , पाणीपटटी व २% दंडात्मक करासह संपुर्ण रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक अविनाश अनंत भातांबरेकर, रा. सेल्स टॅक्स कॉलनी, पा.ला. रोड,अ.नगर येथे प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६२ , बिल क्र.Z१६२०६६१९३(६२-८१४) या नावाने मालमत्ताकर व पाणीपटटी कर आकारणीची नोंद असुन देखील यांच्या नावे बिल क्र.Z१६२०६६६२५(१२०७) वरील येणारी मालमत्ताकर , पाणीपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ताधारक अविनाश अनंत भातांबरेकर, रा. सेल्स टॅक्स कॉलनी, पा.ला. रोड,अ.नगर येथे प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ६२ , बिल क्र.Z१६२०६६१९३(६२-८१४) या नावाने मालमत्ताकर व पाणीपटटी कर आकारणीची नोंद असुन देखील यांच्या नावे बिल क्र.Z१६२०६६६२५(१२०७) वरील येणारी मालमत्ताकर , पाणीपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०२ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार डॉ. देवदत गोविंद केतकर, रा. फायनल प्लॉट नं.१७६, टिळक रोड,अ.नगर यांना वॉर्ड क्र.२२ ,बिल क्र. Z४२२१०५६८४ या वाणिज्य प्रमाणे आकारलेली पाणीपटटी कमीकरणेबाबत व्यावसायिक दराने आकारण्यात आलेली पाणीपटटी रद्द करून निवासी दराने पाणीपटटी सुधारित बील देण्यांची व्यवस्था करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की,डॉ.श्री.देवदत्त गोविंद केतकर यांनी प्लॉट क्र.१७६ वरिल इमारत पाडत असल्याने तेथील मालमत्ता कर कमी करणे विषयी दि.१९/४/२०१४ अन्वये विनंती अर्ज केला होता.त्यानंसातर खुल्या जागेचा दर आकारण्यात आलेला आहे.तयानंतर सदर जागेवर अस्ती प्लाझा हि इमारत बांधण्यात आलेली असून दि.७/१०/२०१६ रोजी भोगवटा प्रमाणपत्र मिळवलेले आहे.सन २०१९-२०२० चे बिल मिळाले त्यामध्ये पाणीपट्टी व्यावसायीक दराने (बिगर निवासी) आकारण्यात आलेली आहे.तरी पाणीपट्टी रद्द करून निवासी दराने पाणीपट्टीचे सुधारीत बिल देण्यात यावे अशी मागणी केलेली आहे.

या बाबत वास्तविक परिस्थिती अशी की,वॉर्ड क्र.२२ बिल क्र.११६ या बिलावर डॉ.श्री.देवदत्त गोविंद केतकर नांवे मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.अर्जदार यांनी सन २०१४-२०१५ मध्ये पुर्वीचे संपुर्ण बांधकाम पाडून टाकून मोकळया जागेप्रमाणे आकारणी करणे बाबत दि.१९/४/१४ रोजी अर्ज सादर केलेला आहे.उक्त अर्जानुसार अर्जदार यांनी जुनी आकारणी कमी करून मोकळया जागेची आकारणी करण्यात आलेली आहे.पुर्वीपासुन सदर जागेमध्ये १/२" चे एकुण ३ नळ जोड असल्याने बांधकाम सुरू केल्यामुळे पाणीपट्टी ही वाणिज्य दराप्रमाणे रू.१०,८००/- या प्रमाणे दरवर्षास पाणीपट्टी रू.३२,४००/- आकारण्यात आलेली आहे.

अर्जदार यांनी सन २०१४-१५ मध्ये नवीन बांधकाम करणेसाठी जा.क्र.टि.पी.३०८४ दि.१६/०४/२०१४ अन्वये बांधकाम परवानगी घेवून आस्मी प्लाझा हया इमारतीचे बांधकाम केलेले आहे.तसेच सन २०१६-१७ मध्ये अर्जदार यांनी दिनांक ७/१०/१६ पासून भोगवटा प्रमाणपत्र जा.क्र.टि.पी.१४३ दिनांक ५/१०/१६ अन्वये घेतलेले आहे.

अर्जदार यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले असल्याने सन २०१६-१७ पासुन वाणिज्य दराने आकारलेली पाणीपट्टी कमी करून निवासी दर १/२" नळ जोड यास रू.१५००/-या प्रमाणे ३ नळ जोड यास दरवर्षास रू.४५००/- या प्रमाणे आकारणी करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यतेस सादर.

यावर सहाय्यक मुल्य कर निर्धारक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सदर जागेत पुर्वी वाणिज्य दरानुसार नळजोडणी आकारणी होत होती.त्या जागेवर वाणिज्य व निवासी असा इमारतीच्या वापरासाठी बांधकाम करण्यात आले आहे.त्या ठिकाणी निवासी वापराकरिता सदनिका असल्याने वाणिज्य दरानुसार पाणीपट्टीची होणारी आकारणी कमी करून निवासी दराने पाणीपट्टी आकारणी करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुकत कर यांचा अभिप्राय की,सन २०१६पर्यतची पाणीपट्टीची थकबाकी भरून घेवून ८ ऑक्टो २०१६ पासून प्रस्तावित प्रमाणे पाणीपट्टीची आकारणी करावी तसेच सदर आस्ता प्लाझामधील व्यापारी गाळयांसाठि किंवा व्यवसायीक कारणांसाठी पाण्याचा वापर कोण करीत आहे का याची खात्री करावी.

यावर वसुली लिपीक,करी निरीक्षक,प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,मालमत्ता धारक श्री.देवदत्त गोविंद केतकर यांनी भोगवटा प्रमाण पत्र घेतलेले असल्याने त्यांना वाणिज्य वापरातील येत असलेली पाणीपट्टीची

आकारणी असलेली रहिवास प्रमाणे आकारणी करणेस रहिवास दर वापर प्रमाणे आकारणी देणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मान्य त्यामधील निर्लेखीत करावयाच्या रकमेची माहिती देवून सदरच्या प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्लेखित करणेसाठी ठेवावा.

यावर कर निरीक्षक व प्रभाग अधिकारी यांचा अहवाल,मा.आयुक्त साहेब,मालमत्ता धारक श्री.देवदत्त गेविंद केतकर यांची वाणिज्य वापरात येणारी पाणीपट्टी चुकुन येत असल्याने सदरील मिळकतीचा वापर रहिवास असल्याने वाणिज्य पाणीपट्टी हि वसुल न होणारी असल्याने सदर थकबाकी रू.५०,७८५/-इतकी निर्लेखीत करणे बाबत अधिनियमातील वसुल न होणारी थकबाकी कलम १५२ नुसार तरतुद असल्याने उक्त नियमानुसार थकबाकी निर्लेखीत करणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,पुर्वप्रस्ताविती A मधील प्रस्तावामध्ये वाणिज्य आकारणी रक्कम ५०७८५/-आहे.त्यानुसार A मधील रहिवासी आकारणी ८ ऑक्टोंबर २०१६ पासून २०१९-२० पर्यत किती होते याची माहिती दयावी.व ती रक्कम अर्जदाराने भरली नसलेस भरून घ्यावी.व उर्वरित रक्कम निर्लेखित करणेसाठी २०१९-२० पर्यतची एकुण थकबाकी व त्यामधील ७ ऑक्टोंबर २०१६ पर्यतची वाणिज्य आकारणी रक्कम किती व ८ ऑक्टोंबर २०१६ पासून मार्च २० पर्यतची वाणिज्य व रहिवास आकारणी रक्कम यांची माहिती तक्त्याव्दारे सादर करावी.

यावर वसुली लिपीक,कर निरीक्षक,प्रभाग अधिकारी यांचा अभिप्रय की, फेरसादर मालमत्ता धारक श्री.देवदत्त गोविंद केतकर यांनी सन २०१६-१७ अखेरची थकबाकी पावती नं as/३१८८५ दि.७/७/२०१६ ने रूपये ६३७७७/- वसुल करण्यात आलेली आहे.सन २०१७-१८ पावती नं AS/३६१४५ दि.९/१०/१७ ने रूपये ३३७८१/- भरलेली आहे सदरील मालमत्ता धारक यांनी सन २०१६-१८ पर्यत थकबाकी रूपये ९७,५५८/- भरलेली असून सन २०१८-१९ बाकी रू.३०,२५०/-वाणीज्य दराने बाकी असून सदरील सदनिका मिळकती या वापर रहिवास असल्याने रहिवास दर सन २०१८-१९ २०१९-२० ची थकबाकी रहिवास प्रमाणे रू.१२०००/- इतकी असून सदर मालमत्ता पाणीपट्टी बिल भरले सध्या ६८,७८५/- इतकी असून रहिवास रक्कम १२०००/- वजाजाता ५६,७८५/- इतकी रक्कम बिलातील निर्लेखीत करणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,A मधील रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवणेस मान्यतेकामी सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार डॉ. देवदत गोविंद केतकर, रा. फायनल प्लॉट नं.१७६, टिळक रोड,अ.नगर यांना वॉर्ड क्र.२२ ,बिल क्र. Z४२२१०५६८४ व्यावसायिक दराने आकारण्यात आलेली पाणीपटटी रद्द करून निवासी दराने पाणीपटटी सुधारित बील देण्यांची व्यवस्था करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.अविनाश घुले :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार डॉ. देवदत गोविंद केतकर, रा. फायनल प्लॉट नं.१७६, टिळक रोड,अ.नगर यांना वॉर्ड क्र.२२ ,बिल क्र. Z४२२१०५६८४ व्यावसायिक दराने आकारण्यात आलेली पाणीपटटी रद्द करून

निवासी दराने पाणीपटटीचे सुधारित बील देणे व उर्वरित येणारी रक्कम  निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार डॉ. देवदत गोविंद केतकर, रा. फायनल प्लॉट नं.१७६, टिळक रोड,अ.नगर यांना वॉर्ड क्र.२२ ,बिल क्र. Z४२२१०५६८४ व्यावसायिक दराने आकारण्यात आलेली पाणीपटटी रद्द करून निवासी दराने पाणीपटटीचे सुधारित बील देणे व उर्वरित येणारी रक्कम  निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०३ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.४४६ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव स.नं.१८३/१ ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये ३ वर्षाचा २/३ परतावा मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकुर :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगाव

संदर्भ- श्री. विलास प्रभाकर मुंगी यांचा दि.३१/८/२०१९ चा अर्ज

वरील विषयास अनुसरून विनंतीपुर्वक रिपोर्ट वॉर्ड क्र. ३४ चे वसुली लिपिक यांजकडून देण्यात येतो की, श्री. महालक्ष्मी वेअर हौसींग कंपनीचे प्रोप्रायटर श्री. विलास प्रभाकर मुंगी यांनी अर्ज देउन कळविले आहे की, सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवीमंदिर शास्त्रीनगर केडगाव वॉ.नं.३४ बिल नं.४४६ मालमत्ता क्र.Z४३४११७४०२ ही मालमत्ता गोडउन म्हणून आहे. सदरचे गोडाउन हे ३ वर्षापासून बंद आहे. तसेच या मिळकतीपासून कुठलेही आर्थिक उत्पन्न मिळत नाही त्यामुळे माझे मालमत्तेच्या करावर ३ वर्षाचा २/३ परतावा मिळावा असे अर्जदार यांनी लेखी अर्ज देउन कळविले आहे.

अर्जदार यांचे अर्जाअनुशंगीक महानगरपालिका दप्तरी व प्रत्यक्ष दर्शी विभाग प्रमुख यांचे समवेत स्थळ पाहणी केली असता असे निदर्शनास येते की, सदरचे गोडाउन हे ४ वर्षापासून बंद स्वरूपात असून त्यागोडाउनचे दरवाजा नादुरूस्त झालेले आहे व सर्वत्र दुर्गंधी आढळून येते. यापूर्वीही अर्जदार यांनी गोडावून बंद असलेबाबत २/३ परतावा मिळणेबाबत दिनांक २२/२/२०१७ रोजी या कार्यालयाकडे अर्ज सादर केला होता व सदरचे अर्जानुसार ऑफिस रिपोर्ट व पाहणी अहवालानुसार मा.उपायुक्त साहेब यांचे दिनांक २०/३/२०१७ चे मंजुरीने सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण करावर २/३ परतावा रक्कम रू.१८९९६०/- देण्यात आला होता.

मंजुर रिपोर्टप्रमाणे अर्जदार यांनी सन २०१६-२०१७ अखेर संपुर्ण कराचा भरणा देखील केलेला होता. अर्जदार यांनी सन २०१७-१८ ते २०१९-२० असे ३ वर्षाचा गोडावून बंद असल्यामुळे मालमत्ता करावर २/३ परतावा मिळण्याबाबतची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदार यांनी दरवर्षी आर्थिक वर्षाच्या सुरूवातील गोडावून बंद व वापर नाही याबाबत अर्ज देउन कळविणे बंधनकारक होते परंतु अर्जदार यांनी त्यांचे असणारे वाढते वय व कुंटुबासह बाहेरगांवी राहत असल्यामुळे अर्ज देण्यास विलंब झाल्याचे प्रामाणिकपणे अर्जात नमुद केलेले आहे. तसेच ३ वर्षाचा २/३ परतावा मिळाल्यास मंजुरी रिपोर्ट प्रमाणे येणारी रक्कम एकरकमी भरण्यास मालमत्ताधारक यांनी सहमती देखील दर्शविलेली आहे.

सदयस्थितीचे अवलोकन केले असता मालमत्ताधारक यांना महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधि.१९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम कलम ५६(२) अन्वये सदर मिळकतीस २/३ रक्कम कमी करणेस तरतुद आहे. सदर मिळकतीचा सर्वसाधारण कर २८४९४१ असून २/३ परतावा प्रति वर्ष रक्कम रूपये १८९९६०/- याप्रमाणे सन २०१७-१८ ते २०१९-२० अशी ३ वर्षाचे २/३ परतावा एकुण रक्कम रूपये ५६९८८०/- कमी करावी लागेल. तरी सदर रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर. /अ

येणेप्रमाणे वसुली लिपिक / विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व विभाग प्रमुख यांनी प्रस्तावीत केलेनुसार सदरचे गोडावून बंद असल्याने महाराष्ट्र मनपा अधि. कलम ५६(२) नुसार सन २०१७-१८ व सन २०१९-२० अखेर दोन तृतीअंश (२/३) परतावा देउन उर्वरित रक्कम वसुल करणेस आदेशार्थ सादर.

यावर सहा. मु.नि.तथा कर सं.अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार धान्य गोडावून फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया यांना मासिक भाडेतत्वावर देण्यात आले होते. दि.१/४/२०१६ पासून सदर गोडावान बंद असुन त्याचा वापर होत नाही. उक्त अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण ८ कराधान नियम ५६(२) नुसार सर्वसाधारण करात २/६.३ परतावा देणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) अभिप्राय की, "अ" नुसार दयावयाचा परतावा रक्कम रू.५६९८८०/- बाबत खात्री करून सादर करावे. (परतावा किती दयावयाचा व भरून घ्यावयाच्या किती ?)

यावर वसुली लिपिक / केडगाव विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर, आपण सुचित केल्यानुसार वॉर्ड क्र.३४ बिल क्र.Z४३४११७४०२ चे मालमत्ता धारक श्री. विलासराव मुंगी, रसाळ, कुटे (श्री. महालक्ष्मी वेअर हौसींग कंपनी) यांच्या ३ वर्षापासून (सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० ) बंद असलेल्या मिळकती (गोडाउन ) बाबत एकुण परतावा रक्कम रूपये ५,७९,८८०/- प्रती वर्षी प्रमाणे येणारा २/३ परतावा रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे

| सन | सर्वसाधारण कर | २/३ परतावा रकक्म | २/३ परतावा वजा जाता भरून हयावयाची रककम |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | २८४९४१/- | १८९९६०/- | ९४९८१/- |
| २०१८-१९ | २८४९४१/- | १८९९६०/- | ९४९८१/- |
| २०१९-२० | २८४९४१/- | १८९९६०/- | ९४९८१/- |
| | | एकुण ५,७९,८८/- | एकुण २,८४,९४३/- |

तरी वरील तक्त्याप्रमाणे मालमत्ता धारक यांना यांच्या मिळकतीच्या सर्वसाधारण करावर २/३ परतावा रक्कम रूपये ५,७९,८८०/- एवढा दयावा लागेल व २/३ परतावा जाता सर्वसाधारण करात रक्कम रूपये २,८४,९४३/- एवढी भरून घ्यावी लागेल तथापी आदेशार्थ सविनय फेरसादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अभिप्राय की, फेरसादर प्रस्तावीतनुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मालमत्ता कराची बिले यापुर्वीच दिली असल्यामुळे सदर बिलातील परताव्याची रक्कम निर्लेखित करणे आवश्यक आहे. त्यानुसार परताव्याची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करावा व उर्वरित रक्कम भरूण घ्यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.४४६ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव स.नं.१८३/१ ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये ३ वर्षाचा २/३ परतावा मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.अविनाश घुले :-विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.४४६ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव स.नं.१८३/१ ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये ३ वर्षाचा २/३ परतावा मिळणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.४४६ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव स.नं.१८३/१ ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये ३ वर्षाचा २/३ परतावा मिळणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०४ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** वॉर्ड नं.२ , बील क्र.९३८,९४०,९४१ या बिलांबाबत समक्ष स्थळ पाहणी केली असता एकुण ८ प्लॉट व १ दुकान (गाळा) असे ९ मिळकती आढळून आलेल्या कर आकारणी बिले व रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ वसुली विभाग

प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.२ मध्ये शहा मुळे व करिता भागीदार प्रमोद हिम्मतलाल शहा यांनी योगीराज अपार्टमेंट या नांवे जागा विकसीत केली.सदर ठिकाणी ८ फ्लॅट व पुर्वी ६ गाळे बांधलेले होते.परंतु काही कारणाने गाळे विक्री होत नाही या कारणाने सदर गाळयांचे फ्लॅ्ट मध्ये रूपांतर केले व त्यानुसार खरेदीखत करून त्याप्रमाणे सिटी सर्व्हे कडे जागा व जागेबाबतचा तपशील नोंदविणेत आलेला आहे.

परंतु तत्कालीन घरपट्टी सर्व्हे मध्ये संपुर्ण अपार्टमेंटची एकत्र आकारणी करणेत आलेली असून तत्कालीन आर्थिक वर्षात थकबाकि रक्कम वाढत असलेने थकबाकी भरणे्‌ बाबत व नावे नोंद करणे बाबत तगादे केलेने तत्कालीन वसुली लिपीक यांनी समक्ष स्थळ पहाणी करून सदयस्थीतीचे अवलोकन करून त्याप्रमाणे घरपट्टी कराची फाळणी करून स्वतंत्र्यरित्या कराचा भरणा करून घेतलेला आहे.

सदरच्या स्वतंत्ररित्या नोंदी तत्कालीन वसुली लिपीक यांनी संगणकावर घेतल्या परंतु सदर फ्लॅट मधिल फ्लॅट धारक भोग मिरा लक्ष्मण पागा मालमत्ता हंस्तांतरण करणेकामी प्रकरणास शेरांकन क्रम प्राप्त असुन वसुली विभागाकडे शेंरांकनाकामी मालमत्ता धारक आले असता फ्लॅ्टचा बिल क्र.उदबोध होत नसल्याने संदर्भान्वये समक्ष स्थळ पहाणी केली असता असे निदर्शनास आले की,तत्कालीन वसुली लिपीक यांनी फाळणी करते वेळी व तदनंतर बिल क्र.९३८९४०९४१ रद्द करावयास क्रमप्राप्त असतांना रद्द न केल्याने सदर बिलाच्या दुबार नोंदी निदर्शनास येत असून बिल क्र.व रक्कमा शास्तीसह खालील प्रमाणे

बिल क्र.९३८ रू.९५१९२/-२.बिल क्र.९४० रू.३३१५७/- ३. बिल क्र.३२७५१/- एकुण रू.१३११००/- तसेच समक्ष पहाणीनुसार सदर ठिकाणी ८ फ्लॅट व १ दुकान असे आढळून आलेले असुन त्याचे बिल क्र.९३५,९३६,९३७,९३९,९४३,९४४,९४५,९४६ फ्लॅ्ट असुन बिल क्र.९४२ दुकान आहे. तथापी बि.क्र ९३८,९४०,९४१ बिले व रक्कमा वसुल होण्याजोगी नसुन महाराष्ट्र मनपा अधि. १९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२मधिल तरतुद वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुली करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्यामते वसुल होण्याजोगी नसेल ते वेळोवेळी निर्लेखीत करता येईल.अशी तरतुद असुन बिल नं ९३८,९४१ वरील रक्कम सन २०१९-२०२० जुलै २०१९अखेर१३११००/-रू.बिले व रक्कमा निर्लेखीत करणेकामी अहवाल मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार व करनिरीक्षक यांचे अभिप्रायानुसार दुरूस्तीस आदेशार्थ सादर.

यावर सहा.कर मुल्य निर्धारक अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार जुना मा.क्र.९३८,९४०,९४१ या मालमत्ता क्रमांकावर केलेल्या आकारण्या जादा झाल्याचे दिसुन येते त्या सदयस्थितीत जागेवर मालमत्ता नसल्याने त्यातीन मालमत्ता रद्द करून त्या वरील मालमत्ता कर वसूल होणारा नाही.त्यामुळे सदर मालमत्ता वरील मालमत्ताकर निर्लेखित करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,चर्चा करावी. ९३८,९४०,९४१ या बिलावर पुर्वी गाळे होते का ? असलेस त्या गाळयांची स्वतंत्र्य आकारणी किती होती ? पुर्वपृष्ठावर A मध्ये केलेनुसार त्यावेळी किती गाळयांचे एकत्रिकरण किती फ्लॅट केले व त्याची आकारणी किती होती तसेच B मध्ये नमुद केलेनुसार नक्की काय झाले ? ९३८,९४०,९४१ हे तीन गाळयांचे बिल आहे.की फ्लॅटचे ? ९३५,३६,३७,३९,४३,४२,४४,४५,४६ असे ७ फ्लॅट आहेत ते किती गाळे एकत्रीत करून केले.सदर इमारतीमध्ये पुर्वी एकूण किती गाळे होते?पुर्वीची करयोग्य मुल्यकिती फ्लॅटच किती कर योग्य मुल्यातील तफावर कीती? निर्लेखिती करावयाची रक्कम कीती

वरील मुद्यांचा समावेश करून स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.

यावर वसुली लिपीकांचा अभिप्राय की,फेरसादर,विनंती फेरसादर करण्यात येते की,बील नं ९३८,९४० व ९४१ या बिलावर स्वतंत्र गाळे होते व त्यानुसार त्यांच्यावर स्वतंत्र्य आकारणी करण्यात आलेली आहे.बिल नं ९३८ चे करयोग्य मुल्य २२८४/- बिल नं ९४० चे करयोग्य मुल्य २२८५/- बील नं ९४१ चे करयोग्य मुल्य २२१४/- सदर ठिकाणी एकुण ६ गाळे असुन त्यापैकी ५ गाळयांचे दोन फ्लॉट मध्ये एकत्रीकरण करण्यात आलेले आहे.श्री.विलास रत्नावर भंडारी यांना आज स्थितीस निवासी दराप्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे व मीरा लक्षमण पागा यांना अनिवासी दराने आकारणी करण्यात येत आहे.तरी ९३८,९४० व ९४१ या बिलांची एकुण आकारणी ६९८३/- व श्री विलास रत्नाकर भंडारी बिल नं.९३७ यांची आकारणीचे करयोग्य मुल्य ३०८९/- आले आहे.तसेच तत्कालीन सर्व्हे मध्ये बिल नं.९३८,९४०,व ९४१ हे रद्द करणे क्रमप्राप्त असतांना रद्द न केल्यामुळे सदर बिलाच्या दुबार नोंदी आढळून येत आहेत.तरी हे तीन बिले ९३८,९४०,व ९४१ हे गाळयांचे आहे व उर्वरीत बिल नं ९२५,९३६,९३७,९३९,९४३,९४४,९४५,९४६,असे एकुण आठ फ्लॅट असुन बिल नं ९४२ हे गाळयांचे बिल आहे.सदर इमारती मध्ये पुर्वी एकुण ६ गाळे होते.त्यापैकी ५ गाळयांचे एकत्रीकरण करून दोन फ्लॅट तयार केलेले आहे.आज सदय स्थीतीमध्ये बिल नं.९३८,९४०,व ९४१ व बिल नं९३७व ९३९ चा बिल नंबर वर ५ गाळे होते .त्यापैकी बिलनं.९३८,९४०व ९४१ यांचे करयोग्य मुल्य ६९८६ व बिल नं ९३७ फ्लॅटचे श्री विलास रत्नाकर भंडारी यांचे करयोग्य मुल्य ३०८९/- आहे असे ४ बिलांचे मिळून करयोग्य मुल्य १०,०७२/- एवढे येत आहे.व बिल नं.९३५,९३६ ९३७,९३९,९४२,९४३,९४४,९४५,व ९४६ यांचे करयोग्य मुल्य ३१,२८३/- एवढे येत आहे.तसेच बील नं ९३८,९४०व ९४१ या तीन बिलांची निर्लेखीत करावयाची रक्कम १,३१,१००/- एवढी आहे.तरी येणे प्रमाणे फेर सादर करण्यात येत आहे.

यावर कर निरीक्षक यांची स्वाक्षरी

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,थोडक्यात मा.उपायुक्त कर यांचे शेरांकनानुसार स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करावा.

यावर वसुली लिपीक यांनी फेरसादर केले,प्रस्तुत सादर केलेल्या प्रस्तावावरील शेरांकनानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यात येत आहे.सन २००२चे फेर मुल्यांकन सर्व्हे नुसार व टाचण नोंद वही अभिलेख पडताळणी प्रमाणे एकुण ६ गाळे आहेत.त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| जुना बिल नं | नविन बिल नं | मालमत्ता धारक | मालमत्तेचा तपशिल | करयोग्य मुल्य | मागिल थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ९४७ | ९३८ | शहा मुळे तर्फे रविंद मुळे | गाळा | २२८४/- | ६५,१९२/- | पुर्वीचे गाळे सन २००२ च्या फेर मुल्यांकन सर्व्हे मध्ये फ्लॅट मध्ये रूपांतरीत झाल्याने जुना बिल नं.९४७,९४९,९५० रद्द करून ९३८,९४०,९४१ हे नविन बिल क्र झालेले आहेत त्यामुळे मालमत्ता कराच्या दुबार नोंदी आढळून येत आहे.व सदर गाळयांचे फ्लॅट मध्ये एकत्रीकरण करण्यात आलेले दिसून येते |
| ९४९ | ९४० | शहा मुळे तर्फे गणेश मुळे | गाळा | २२८५/- | ३३,१५७/- | |
| ९५० | ९४१ | शहा मुळे तर्फे गणेश मुळे | गाळा | २२१४ | ३२,७५१/- | |
| ९५१ | ९४२ | आशा अशोक सब्बन | गाळा | २३०९ | | सद्यस्थितीत अस्तित्वात आहे. |
| ९४८ | ९३९ | मिरा लक्ष्मण पागा | फ्लॅट | २८५७ | ०० | जुना बिल नं.९४९व ९४८ हे बिले नविन विल नं९३९ वर वर्ग करण्यात आलेला असून सदर आकारण्यात आलेला मालमत्ता कर हा अनिवासी ऐवजी निवासी प्रमाणे दुरूस्ती करणे उचित होईल. |
| ९४६ | ९३७ | विलास रत्नाकर भंडारी | फ्लॅट | ३०८९ | | सदर गाळयांचे सन २००२ च्या फेर मुल्यांकन मध्ये फ्लॅटमध्ये एकत्रीकरण झालेले आहे व मालमत्ता कर निवासी प्रामाणे आहे. |

तसेच फेर मुल्यांकनामध्ये नमुद गाळयापैकी काही गाळयांचे वापरात बदल होवून रहिवास सदनिका (फ्लॅट)रूपांतर झालेले आहे.त्याचा तपशिल खालील प्रामाणे

| बिल नं | फलॅट मालमत्ता धारक | मालमत्तेचा तपशिल | करयोग्य मुल्य | मागील थकबाकी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ९३५ | शारदा शरद काळे (फलॅट नं १) | फलॅट | ३३३५/- | १८२६/- | |
| ९३६ | अर्चन विष्णू तिवारी (फलॅट नं ६) | फलॅट | ३३७४/- | ३९४०/- | |
| ९३७ | विलास रत्नाकर भंडारी (फलॅट नं ७) गाळा | फलॅट | ३०८९/- | १७२५/- | |
| ९३९ | मिरा लक्ष्मण पागा (फलॅट नं ७) | फलॅट | २८५७/- | ०० | |
| ९४६ | भारती तुळशीदास किंगा (फलॅट नं २) | फलॅट | ३३८९/- | १८४६/- | |
| ९४३ | तुळशीदास जनार्धन लिपारे (फलॅट नं २) | फलॅट | ४७६६/- | २३९८/- | |
| ९४४ | दत्तात्रय कृष्णराव शेकटकर (फलॅट नं ३) | फलॅट | ४८२२/- | २१३९५/- | |
| ९४५ | भारती तुळशीदास किंगर (फलॅट नं ४) | फलॅट | ३३४९/- | १८३०/- | |

वरील तक्ता १ व २ पाहता बिल नं.९३८,९४०,९४१ या बिलांचे फलॉटमध्ये एकत्रीकरण झाल्याचे व त्याच मिळकतीवर दुबार बिले दिसुन येत असलयाने नमुद ३ बिलांवर आकारणी केलेली मालमत्ता कराची रक्कम व बिले निर्लेखीत करणे उचित होईल.फेर सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी दि.९/८/१९ चे शेरांकनानुसार सविनय फेरसादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,उपरोक्त A प्रमाणे नमुद केलेनुसार निर्लेखित करावयाची रक्कम बिलाची रक्कम व त्यावरील शास्तीची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेसाठी मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव सादर करावा.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती मध्ये विचारार्थ ठेवा.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- वॉर्ड नं.२ , बील क्र.९३८,९४०,९४१ या बिलांबाबत समक्ष स्थळ पाहणी केली असता एकुण ८ प्लॉट व १ दुकान (गाळा) असे ९ मिळकती आढळून आलेल्या कर आकारणी बिले व रक्कम निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश भोसले :- विषय क्रमांक ९३ ते १०४ व ११३ व ११४ सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.अविनाश घुले :-विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- बिल क्र ९३८,९४०,९४१ बिले व रक्कमा वसुल होण्याजोगी नसुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ मधिल तरतुद वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे बाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार बिल क्र ९३८,९४०,९४१ बिल व रक्कमा वसुल होण्याजोगी नसुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ मधिल तरतुद वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे बाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०५ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतात्रिक कर्मचारी यांची दि.१३/०९/२०१९ रोजी मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत मुळानगर पंपीग स्टेशन ते वसंत टेकडी दरम्यान कार्यरत शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे विस्तृत स्वरूप व आवश्यकता विचारात घेवून याकामी एकुण १४५ कर्मचा-यांचा आकृतीबंध मंजूर आहे. सन १९९९ ला सदर योजना हस्तांतरणाच्या वेळेस एकुण ११० कर्मचारी योजेनवर हजर झालेले होते. तद्नंतर आजअखेर यापैकी ६८ कर्मचारी सेवानिवृत्त /मयत झालेले असल्याने फक्त एकुण ३४ कायम कर्मचारी कार्यरत असून ९ कर्मचारी आस्थापना विभागामार्फत मानधनावर नेमणूक केलेली आहे.

शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची कर्मचा-यां अभावी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारण वितरण व्यवस्थेचे कामाचे स्वरूप विचारात घेता त्याकरिता असलेला तांत्रिक व अंतांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे. त्यामुळे नागरिकांच्या प्राप्त दैनंदिन तक्रारीचा वेळेत निपटारा होत नाही. पर्यायाने शहरासाठी मुळाधरण येथून पाणी उपलब्ध होत आहे ते पाणी वितरण करीत असतांना काही नागरी भागास गरजेपेक्षा जास्त व काही भागास अत्यल्प पाणी पुरवठा होत आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त / मयत झालेल्या कर्मचा-यांच्या जागी नव्याने / पर्यायी कर्मचारी उपलब्ध करून देणेबाबत मा.आयुक्त / मा. उपायुक्त यांचे मान्यतेने यापूर्वी प्रस्तावाद्वारे आस्थापना विभागाकडे मागणी करण्यांत आलेली आहे. परंतु आस्थापना विभागाकडून अद्यापपर्यत कर्मचारी मिळालेले नाहीत.त्यामुळे पाणीपुरवठा विषयक दैनंदिन तक्रारी वाढत जावून कर्मचा-या अभावी पाणी वितरण व्यवस्थेची व दुरूस्तीची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

या अनुषंगाने खालील तक्त्यात नमुद कर्मचारी अ.नं.१ ते १२ हे मनपा सेवेतून निवृत्त झालेले असुन अ.नं. १ ते ८ हे कर्मचारी सध्या मानधनावर कार्यरत असून अ.नं. ९ व १०चे कर्मचारी यांनी या पुर्वी कामावर घेणे बाबतचा आदेश स्विकारलेला नाही व अ.नं.१२ चे कर्मचारी श्री. शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झालेले आहेत. पंरतू या सर्व कर्मचा-यांनी नव्याने इकडेस अर्ज देवून कामावर घेणे बाबत अर्ज सादर केलेला आहे.

सदर अ.नं. १ ते ९ कर्मचारी यांची मानधनावरील सेवा दि.७/९/२०१९ रोजी संपुष्टात येत असुन त्यांना देण्यात येणारे मानधन व प्रत्यक्ष काम करण्याचे ठिकाण खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | नाव | तातपुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | सध्या कार्यरत असलेले व नव्याने रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.गोरख रंगनाथ तेलारे | वीजतंत्री | १२,०००/- | विळद पंपीग स्टेशन , मेटेनन्स विभाग |
| २ | श्री. घोडेकर ए.ए. | वीजतंत्री | १२,०००/- | विळद पंपीग स्टेशन , मेटेनन्स विभाग |
| ३ | श्री. दशरथ भागाजी शिंदे | फिटर | १२,०००/- | शहर पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| ४ | श्री. गागरे साहेबराव भागाजी | फिल्टर ऑपरेटर / मदतनीस | १०,०००/- | जलशुध्दीकरण केंद्र, विळद |
| ५ | देविदास माधवराव लेंडकर | पंपऑपरेटर / | १०,०००/- | विळद पंपीग स्टेशन , पंप ऑपरेटर मदतनीस |
| ६ | श्री. बाळु लक्ष्मण फुलसौंदर | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | सावेडी भागातील लक्ष्मीनगर , सुर्यनगर, तवलेनगर , इत्यादी परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |
| ७ | दिपक बाळु खताडे | बिगारी वॉचमन | १०,०००/- | रिझरवायर पाण्याची टाकी येथे वॉचमन |
| ८ | मधुकर विश्वनाथ काळे | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | प्रभाग क्र.१ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | शांताराम माधव पाचारणे | फिटर मदतनीस | १०,०००/- | शहर पाणी पुरवठा योजना बोल्हेगांव , नागापुर जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| १० | धोडीराम नामदेव कराळे | पंप ऑपरेटर / मदतनीस | १०,०००/- | विळद पंपीग स्टेशन , पंप ऑपरेटर मदतनीस |
| ११ | श्री. शेख नय्युम इस्माईल | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | प्रभाग क्र.३ नवीन दर्गा दायरा सह इतर परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |
| १२ | किशोर विठ्ठल शिंदे | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | प्रभाग क्र.२ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |

उपरोक्त तक्त्यातील सर्व कर्मचारी हे सेवानिवृत्त असून मनपाचे विळद येथील विजतंत्री व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी या कर्मचा-यांना मानधनावर नेमणूक मिळणेबाबत शिफारस केलेली आहे. तसेच त्यांनी पाणी पुरवठा विभागाकडील केलेल्या कामाचा अनुभव विचारात घेता, तांत्रिक व अतांत्रिक अनुभवी कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता सदर कर्मचारी यांची महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी वीजतंत्री /फिटर/फिल्टर मदतनीस / व्हालमन मदतनीस यांची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस विनंती आहे.

करिता

१. वरील कर्मचारी यांनी मानधनावर घेणेबाबत अर्ज इकडेस प्राप्त झाले आहेत. पाणी पुरवठा विभागाकडील कामाची अत्यावश्यकता पाहता त्यांना मानधनावर घेणे संयुक्तीक राहिल.
२. तसेच वरील कर्मचारी यांनी जे मानधन यापूर्वी दिलेले आहे. त्यामध्ये वाढ करणेबाबत देखील कळविले आहे. याबाबत उचित निर्णय होणेस

तथापी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजुरीस तथा उचित आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मुख्य लेखा अधिकरी यांचा अभिप्राय की, १]अ.क्र.९ आणि १० हयांनी हयापूर्वी आदेश का स्विकारले नाहीत १ पुन्हा त्यांना नव्याने आदेश देणे संयुक्तीक आहे का? खात्री करून निर्णय घ्यावा.२] अ.क्र.९ हयांनी जर आदेशच स्विकारले नाहीत तर त्यांची सेवा ७/९/२०१९ रोजी संपुष्टात कशी येईल. ३] पुन्हा उपरोक्त सदस्यांना आदेश दिले तर ते स्विकारून काम करतील का ? हयाबाबत ही रवातरजमा होणे आवश्यक आहे.

फेर सादर,

विनंती की, नजरचुकीने प्रस्तावात नमुद कर्मचारी अ.नं. १ ते १२ हे महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले असुन अ.नं. १ ते ८ हे कर्मचारी सध्या मानधनावर कार्यरत असून अ.नं. ९ व १० चे कर्मचारी यांनी यापुवीर् कामावर घेणे बाबतचा आदेश स्विकारलेला नाही, असे नमूद आहे.

परंतु प्रत्यक्षात अ.नं. १ ते ९ कर्मचारी सध्या मानधनावर असून अ.नं. १० व ११ चे कर्मचारी यांनी यापुर्वी कामावर घेणेबाबतचा आदेश स्विकारलेला नाही व अ.नं.१२ चे कर्मचारी हे नुकतेच सेवानिवृत्त झालेले आहेत, त्याप्रमाणे फेरसादर खालीलप्रमाणे सादर.

१] अ.नं. ९ व १० चे कर्मचारी यांनी त्यांचे घरगुती अडचणीमुळे कामावर घेणेबाबतचा आदेश स्विकारलेला नव्हता, तथापी यापुढे आदेश दिल्यास स्विकारण्यास तयार आहेत.

२] अ.नं.९ चे कर्मचारी हे सध्या कामावर आहेत, त्याना पुन्हा मुदतवाढ देणेस विनंती आहे.

३] तक्यात नमूद कर्मचारी अ.नं. १ ते १२ यांना कामावर घेणे बाबतचा आदेश दिल्यास सर्व कर्मचारी आदेश स्विकारण्यास तयार आहेत.

तरी कामाची निकड विचारात घेता सर्व कर्मचा-याची आवश्यकता असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजुरीस तथा उचित आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा फेरसादर असे.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की,"अ" खात्री करावी

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ नुसार ५३ (१) नुसार मा.आयुक्तांना मनपाचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समत्युल असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कोणत्याही अ स्थायी नेमणूका ६ मन्यिाहून अधिक नसलेल्या कालावधी साठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटी करता येतील की मा.आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्याविषयी महानगरपालिका ताबडतोब करा दिले पाहिजे आणि उक्त ६ महिन्याच्या कालावधी संपल्या नंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही अशी तरतुद आहे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून तांत्रिक खंड देउन नेमणूक करण्यास व सदरचा विषय मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतात्रिक कर्मचारी यांची दि.१३/०९/२०१९ रोजी मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.अविनाश घुले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतात्रिक कर्मचारी यांची दि.१३/०९/२०१९ रोजी पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी वीजतंत्री /फिटर/फिल्टर मदतनीस / व्हालमन मदतनीस यांची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतात्रिक कर्मचारी यांची दि.१३/०९/२०१९ रोजी पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी वीजतंत्री /फिटर/फिल्टर मदतनीस / व्हालमन मदतनीस यांची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०६ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ ई -निविदा क्र.२०७८ या निविदेच्या मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकुर :- अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा. जिल्हाधिकारी ,अ.नगर दि.०८/०३/२०१९

२. ऑनलाईन ई - निविदा क्र.२०७८/सन २०१९-२० दि.०३/०७/२०१९

३. निविदा विक्री कालावधी- दि. ०३/०७/२०१९ते दि.१७/०७/२०१९

४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि. १८/०७/२०१९ ते दि. २०/०७/२०१९

५. निविदा उघडण्याचा दिनांक- २२/०७/२०१९

६. कामाची मुदत- ६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपिशल- दि.०७/०८/२०१९ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा आलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि/ई निविदा क्र२०७८/२०१९-२० | प्रभाग क्र.१६ केडगाव नविन गावठाण अंतर्गत रस्ते नुतनीकरण व डांबरीकरण करणे | २६,६६,६६७/- | एस.एफ.शेख, अ.नगर | निविदा दरापेक्षा ९.९९% कमी | एस.एफ.शेख,अ.नगर व शहनवाज शेख,अ.नगर यांचे दर समान आहेत निविदा दरापेक्षा ९.९९% कमी |
| | | | शहनवाज शेख, अ.नगर | निविदा दरापेक्षा ९.९९% कमी | |
| | | | श्री. गणेश सप्ला. ॲण्ड कॉट्रॅ., अ.नगर | निविदा दरापेक्षा ०.९९% कमी | |
| | | | यश कंस्ट्र. ॲण्ड सप्लायर्स, अ.नगर | निविदा दरापेक्षा ५.०० % जादा | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्कदृष्टया रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक एस.एफ. शेख अ.नगर व शहनवाज शेख अ.नगर यांची निविदा,विविदा रकमेपेक्षा ९.९९ % इतक्या कमी दराचे परंतु समान आलेले आहे.सदर निविदाधारकांनी व्यापारी लिफाफा उघडल्यापासुन ८दिवसाचे आत रक्कम रू.२७,०००/- रकमेचा डिमांड ड्राफ्ट इकडेस जमा केलेला आहे. तरी श्री.एस.एफ शेख अ.नगर व श्री.शहनवाज शेख या दोन्ही निविदाधारकांना नमुद केलेल्या दरापेक्षा किती कमी दराने काम करावयास तयार आहेत,याबाबत बंद लिफाफ्यात गोपनीय पध्दतीने दर इकडेस सादर करणेबाबत पत्र देणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर. येणे प्रमाणे प्रभाग अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,मा.सादर प्राप्त निविदेमधील Lowest nata नमुद केलेले निविदाकार यांना बंद लिफाफा मध्ये गोपनीय पध्दतीने दर सादर करणे बाबत कळविणेस मंजूरीस्तव सविनय सादर.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की,श्री.एस.एफ.शेख कंन्स्ट्रक्शन व श्री शहानवाज रफिक शेख , या दोन्ही निविदाधारकांचे न्युनतम दर निविदा दरापेक्षा ९.९९ % कमी दराने इतके कमी असल्याने मा.आयुक्त यांचे दि.५/९/१९ रोजीच्या आदेशान्वये एस.एफ.शेख कंन्स्ट्रक्शन व श्री.शहानवाज रफिक शेख ,अहमदनगर हे नमुद केलेल्या दरापेक्षा किती कमी दराने काम करावयास तयार आहेत याबाबत बंद लिफाफ्यात गोपनिय पध्दतीने पुनश्च नविन दर पत्र मिळाल्याचे दिवसापासून ३ कामकाजाच्या दिवसाचे आत इकडेस सादर करणेबाबत इकडील पत्र जा.क्र.सा.बां.वि.१४५२ दि.६/८/१९ अन्वये कळविण्यात आले.त्यानुसार संबंधितांनी दराचा बंद लिफाफा इकडेस मुदतीत सादर केलेला आहे.

तरी सदर कामाचा दराचा बंद व्यापारी लिफाफा उघडणेबाबत उचित आदेश होणेस रिपोर्ट सविनय सादर.

सोबत - सिलबंद व्यापारी लिफाफा

यावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,छाननी समिती समोर ठेवण्यात यावा.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर दि.१७/९/१९ चे छाननीमध्ये लिफाफा उघडल्यानंतर एस.एफ.शेख ,१०.७ Belowपत्र सां.बां.वि. आक्र.१५१९/६-९-१९ रोजी मिळालेनुसार व १-१०%अति.अनामत १% यापुर्वी प्राप्त असलेने श्री.एस.एफ.शेख यांची निविदा निविदादरापेक्षा १० % कमी दराने मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ७३ ड प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी रू.५००/- प्रतिज्ञापत्र सोबत नाही विभागाने खात्री करावी.मा.शहर अभियंता यांनी प्रस्तावित केल्या नुसार १० % कमी दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,

- कार्यादेशावेळी कलम ७३ ड ची कार्यवाही करण्यात येईल.
- रू.५००/- चे प्रतिज्ञापत्र सोबत आहे.
- ई - निविदा क्र.२०७८ निविदा रू.२६,६६,६६७/- १० % कमी दराची निविदा मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्णेस सादर

यावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब सहमतीदर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा**

श्री.सोनटक्के :- नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०१८-१९ मध्ये वॉर्ड क्र.१६ केडगांव गांवठाण अंतर्गत रस्त नुतनीकरण व डांबरीकरण करणे करीता रू.२६,६६,६६७/- ची निविदा आलेली आहे.चार निविदाधारक आहेत दोन निविदा एकाच दराच्या होत्या.

मा.सभापती साहेब :- निविदा रक्कम हि निविदा रक्कमेच्या १० टक्के कमी असतांना ठेकेदार काम कसे करतात.त्यांना कसे परवडते.

श्री.सोनटक्के :- आपण निविदा करतांना सार्व.बांधकाम विभागाचे चालू डि.एस.आर.दरानुसार अंदाजपत्रक तयार करतो.त्यानुसार ठेकेदार निविदा भरतात.

मा.सभापती साहेब :- निविदा रक्कमेपेक्षा १० कमी दराने काम घेण्या-या ठेकेदारांच्या कामाबाबत वेळोवेळी पहाणी करणे आवश्यक आहे.अशा ठेकेदारांची आर.ए.बील करण्यात येवू नये व त्यांना कामाबाबत कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येवू नये.

मा.श्री.गणेश भोसले :- कोठी ते यशपॅलेस कॉक्रीट रस्त्याला चीरा /तडे गेलेले आहेत.ते बुजविलेले नाही.सदर रस्त्याच्या बाजुने असणा-या चेंबरलाईनवरील चेंबरवर झाकणे टाकणे आवश्यक असतांना संबंधीत ठेकेदाराने अदयापपर्यंत झाकणे बसविलेले नाहीत.ज्याठिकाणी काम चालू असेल त्याकामाबाबच्या तपशीलाचा सविस्तर बोर्ड कामाच्या ठिकाणी लावण्यात यावा.म्हणजे नागरीकांना सुध्दा कळेल या मध्ये काय आहे.

मा.सभापती साहेब :- काम पुर्ण झाल्याशिवाय ठेकेदाराचे बिल काढू नये .काम योग्य न झाल्यास डिपॅझिट जप्त करण्यात यावें.

मा.श्री.अविनाश घुले :- ठेकेदाराकडून दिलेल्या मुदतीत काम झाले नाही तर मुदत वाढ देण्यात येवू नये.मुदतीमध्ये काम पुर्ण न करणा-यांना मुदत संपताच नोटीस बजावून काळया यादीत टाकावे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- १ वर्षामध्ये नविन तयार केलेले रस्ता उखडतात.त्यावर खड्डे पडतात.

मा.श्री गणेश भोसले :- मा.शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८ /इमा -२ मंत्रालय दिनांक २७/०९/२०१८ च्या शासन निर्णया मधील मुद्दा क्र.४.६.१.नुसार निविदा प्रक्रिये मध्ये निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा दहा टक्यापेक्षा अधिक दारने कमी असेल तर संबंधित कंत्राटदाराकडून एवढया कमी दराने काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशील निविदा बोलविण्या-या अधिका-याने प्राप्त करून घ्यावा कंत्राटदाराने दिलेल्या तपशीलाच्या आधारे काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पुर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करून घेण्यात यावी. मुद्दा क्र.४.६.२. मध्ये ठेकेदाराने विविदाधीन किंमतीच्या १ टक्का एवढया किमतीची प्रतिपुर्ती हमी/तेवढया रकमेच्या डिमांड ड्राप परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून सादर करावी.असे नमुद करण्यात आलेले आहे.त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा.सौ.सोनाली चितळे:- हि ई - निविदा दरापेक्षा ब-याच कमी दराने असल्याने ठेकेदाराचा कामाचा पुर्व अनुभव लक्षात घेवुन दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण होणे बंधनकारक आहे.अर्धवट अवस्थेत कामे सोडली जावू नये या साठी दक्षता घेण्यात यावी.निविदेमधी्ल कामे कोणत्याही परिस्थतीमध्ये मुदतीतच पुर्ण झाली पाहिजे या कामांना मुदतवाढ देण्यात येवू नये

मा.श्री.मनोज कोतकर :- काम पुर्ण होई पर्यंत पार्ट पेमेंट अथवा आर.ए.बील अदा करू नये. कमी दराच्या निविदे करीता मा.शासनाच्या तरतुदींनुसार जी सुदक्षा अनामत रक्कम घेतली जाते.ती त्तीन पट करण्यात यावी. मुदतीत काम पुर्ण न करणा-यांना मुदत संपताच नोटीस बजावून काळयायादीत टाकावे.अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर महानगरपालिकेच्या नागरी दलित वस्ती सुधार योजना ई- निविदा क्र.२०७८ सन २०१९-२०२० या निविदेतील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया निविदाधारक एस.एफ.शेख,अ.नगर यांची निविदा मंजूर करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२० अंतर्गत ई- निविदा क्र.२०७८ सन २०१९-२०२० अंतर्गत ई- निविदा क्र.२०७८ या निविदेतील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८ /इमा -२ मंत्रालय दिनांक २७/०९/२०१८ च्या शासन निर्णयाची

अंमलबजावणी करावी.पी.डब्लू.डी विभागातील सक्षम अभियंत्यामार्फत कामाची तपासणी करावी. निविदेमधील कामास कोणत्याही परिस्थतीमध्ये मुदतवाढ देण्यात येवू नये. मुदतीत काम पुर्ण न केल्यास कामाची मुदत संपताच नोटीस बजावून ठेकेदार संस्थेस काळयायादीत टाकावे. काम संपुर्ण होई पर्यत पार्ट पेमेंट अथवा आर.ए.बील अदा करू नये. निविदा रकमेच्या १०.०० % कमी दराने दर असल्याने महानगरपालिकेचा आर्थीक फायदा होतांना दिसत असला तरी काम निकृष्ठ होण्याची दाट शक्यता असल्याने वरील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक असल्याने ठरावची काटेकोर अंमलबजावणी करावी.

अहमदनगर महानगरपालिकेच्या नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२० अंतर्गत ई-निविदा क्र.२०७८ या निविदेतील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया निविदाधारक एस.एफ.शेख,अ.नगर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच निविदा रकमेच्या १०.०० % कमी दराच्या निविदेस हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या नागरी दलितवस्ती सुधार योजना सन २०१९-२०२० अंतर्गत ई-निविदा क्र.२०७८ या निविदेतील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८ /इमा -२ मंत्रालय दिनांक २७/०९/२०१८ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी.पी.डब्लू.डी विभागातील सक्षम अभियंत्यामार्फत कामाची तपासणी करावी. निविदेमधील कामास कोणत्याही परिस्थतीमध्ये मुदतवाढ देण्यात येवू नये. मुदतीत काम पुर्ण न केल्यास कामाची मुदत संपताच नोटीस बजावून ठेकेदार संस्थेस काळयायादीत टाकावे. काम संपुर्ण होई पर्यत पार्ट पेमेंट अथवा आर.ए.बील अदा करू नये. निविदा रकमेच्या १०.०० % कमी दराने दर असल्याने महानगरपालिकेचा आर्थीक फायदा होतांना दिसत असला तरी काम निकृष्ठ होण्याची दाट शक्यता असल्याने वरील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक असल्याने ठरावची काटेकोर अंमलबजावणी करावी.

अहमदनगर महानगरपालिकेच्या नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२० अंतर्गत ई-निविदा क्र.२०७८ या निविदेतील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया निविदाधारक एस.एफ.शेख,अ.नगर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच निविदा रकमेच्या १०.०० % कमी दराच्या निविदेस हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.
सुचक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज कोतकर सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०७ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) योजनेतील विकास कामांकरीता प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणूक करणेबाबत ई - निविदा क्र.२०९७ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा.आयुक्त , मनपा ,अ.नगर दि.१९/०७/२०१९

२. ऑनलाईन ई - निविदा क्र.२०९७/सन २०१९-२० दि.२०/०७/२०१९

३. निविदा विक्री कालावधी- दि.१६/०८/२०१९ ते दि.१३/०८/२०१९

४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि.१६/०८/२०१९ ते दि.१९/०८/२०१९

५. निविदा उघडण्याचा दिनांक- २०/०८/२०१९

६. कामाची मुदत- ४ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपिशल- दि.०६/०९/२०१९ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नाव | प्रकल्प किंमत | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (प्रकल्प किंमतीच्या) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि./ ई निविदा क्र.२०९७/ २०१९-२० | अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यभर) योजनेतील विकास कामांकरिता प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणुक करणेबाबत | १००.०० कोटी | मानवसेवा कन्सल्टंट, धुळे<br>सी.व्ही. कंड,पुणे<br>द निसर्ग कन्सल्टंट ,अ.नगर | २.४९ % दराने<br>२.६२ % दराने<br>११.११ % कमी असा दर दिलेला आहे, याबाबत दराचे पृथकरण केले असता २.६६६७% असा दर येत आहे. | मानवसेवा कन्सल्टंट, धुळे<br>२.४९ % कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मानवसेवा कन्सल्टंट, धुळे यांची निविदा २.४९ % दराने आलेली असुन सदरचे सर्वात कमी दराची आहेत.

शासन निर्णय दि.४ जुन २०१८ नुसार उक्त योजनेसाठी एकुण प्रकल्प किंमतीच्या जास्तीत जास्त ३% पर्यत प्रकल्प सल्लागार संस्थेस मंजुर करणेचे निर्देश देण्यात आलेले आहेत त्यानुसार उक्त कामाची ई -निविदा मागविण्यात आलेली होती

तरी सदरची निविदा मानवसेवा कन्सल्टंट , धुळे यांचे २.४९ %आलेले दर मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र. उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ७ मधील कलम ७३ ड प्रमाणे विभागाने खात्री करावी. वाटाघाटी अंती "अ" बाबत उचित निर्णय घेता येईल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्र.T-१७ वर "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी..

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) योजनेतील विकास कामांकरीता प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणूक करणेबाबत ई - निविदा क्र.२०९७ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.कुमार वाकळे :- विभाग प्रमुख यांनी सविस्तर माहिती सांगावी.

श्री.सोनटक्के साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरात्थान महाअभियान योजनेमधील विकास कामांकरीता सल्लागारी म्हणून नेमणूकीकरीता पी.एम.सी.नेमणे कामी निविदा मागविण्यात आलेली आहे.१०० कोटींच्या कामांचे प्रस्ताव तयार करणे करीता निविद मागविण्यात आली आहे.तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.मानवसेवा कन्सल्टंट धुळे यांची कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे.प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर विकास कामांचा डी.पी.आर.तयार करणे त्यासाठी तांत्रिक मान्यता मिळवून देणे सदर कामाची देखभाल पी.एम.सी.यांनी करणे आवश्यक आहे.शासनाच्या अंतीम निर्णयानुसार काम करावे लागणार आहे.

मा.श्री.सुभाष लोंढे :- विकास कामाकरीता नेमण्यात आलल्या पी.एम.सी.चे बील मा.शासन देणार कि महानगरपालिका देणार

पी.एम.सी.प्रतीनिधी श्री. :- पी.एम.सी.काम केल्यानंतर असणारी फि ही महानगपालिका फंडातुन दयावी लागणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरात्थान महाअभियान योजनेमधील विकास कामांकरीता आपणावर कोणकाणती जबाबदारी असेल.

पी.एम.सी.प्रतीनिधी श्री. :- अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगोरात्थान महाअभियान (राज्यस्तर) या योजनेमधील विकास कामाची सविस्तर अंदाजपत्रक तयार करून प्रकल्प अहवाल तयार करणे ,सक्षम प्रधिकराणाकडे तांत्रिक मान्यतेसाठी प्रकल्प अहवाल सादर करणे,सदरचा प्रकल्प अहवाल मा.शासनाकडेस प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करणे,शासनाकडून प्रकल्प अहवाल व निधी मंजूर करून घेणे,निविदा तयार करून देणे,मंजूर कामावर संपुर्ण देखरेख करणे,कामाच्या स्पेसिफिकेशनप्रमाणे काम करून घेणे,झालेल्या दैनंदिन कामाचे मोजमाप घेवून मोजणी पुस्तकात अभिप्रयासह व स्वक्षरीसह नोंद करून देयक स्वाक्षरीसह सादर करणे,काम पुर्ण झाल्यावर काम पुर्णत्वाचचा व गुणवत्तेचा दाखला देणे इत्यादी कामाचा समावेश आहे.

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाली चितळे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) योजनेतील विकास कामांकरीता प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणूक करणेबाबत ई - निविदा क्र.२०९७ नमुद कामांकरीता प्रकल्प सल्लागार म्हणून मानवसेवा कन्सल्टंट,धुळे यांची २.४९% दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

<u>**ठराव :-**</u> ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) योजनेतील विकास कामांकरीता प्रकल्प सल्लागार (PMC) नेमणूक करणेबाबत ई - निविदा क्र.२०९७ नमुद कामांकरीता प्रकल्प सल्लागार म्हणून मानवसेवा कन्सल्टंट,धुळे यांची २.४९% दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज कोतकर सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०८ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

विषय- ई -निविदा क्र.२०३१ मधील बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणेकामी प्राप्त निविदेतील प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता.

संदर्भ- १. मा. तांत्रिक छाननी समिती दि.०६/०६/२०१९ रोजी शिफारशी नुसार

२. मा. तांत्रिक छाननी समिती दि.२१/०६/२०१९ रोजी शिफारशी नुसार

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, मा.आयुक्त यांच्या दि.०४/०३/२०१९ रोजीच्या मंजुरी अन्वये बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणेकामी फेर ई- निविदा क्र.२०३१ दि.०७/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदरील निविदेबाबत आर्थिक व तांत्रिक लिफाफा बंद करते वेळेस पाच निविदाकारांनी भाग घेवून निविदा सादर केली आहे.

त्यानुसार सदरील प्राप्त निविदतील तांत्रिक लिफाफा उघडण्यात येवुन दिनांक ०६/०६/२०१९ रोजी व दिनांक २१/०६/२०१९ रोजी मा. तांत्रिक समिती समोर कागदपत्रांची छाननी कामी ठेवण्यात येवुन त्यापैकी पाच निविदाकार पैकी दोन निविदाकार यांचे कागदपत्रे अपुर्ण असलेल्या दोन निविदा अपात्र ठरले असुन पाच पैकी तीन निविदाकार यांचे दरपत्रक उघडण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाकारांचे आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन खालील प्रमाणे तुलनात्मक दर प्राप्त झालेले आहे.

| अ क्र | कामाचे वर्णन | PH Jadhav, Pune | Debrisolvw Private Limited, Gujarat | Meera Cleanfuels Limited ,Mumbai |
|---|---|---|---|---|
| १ | बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे | दर सर्व करासहीत १ लक्ष घन मीटर कच-याकरीता प्रक्रिया करीता रक्कम रू.३,६७,००,०००/- | दर सर्व करासहीत १ लक्ष घन मीटर कच-याकरीता प्रक्रियाकरीता रक्कम रू.४,०३,००,०००/- | दर सर्व करासहीत १ लक्ष घन मीटर कच-याकरीता प्रक्रियाकरीता रक्कम रू.४,११,८२,५००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिका मालकीचया जागेवर बुरूडगांव स.नं.३४(पैकी) याठिक्‍ाणी घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मंजुरी नुसार बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे कामाकरीता तुलनात्मक दृष्टया PH Jadhav, Pune या निविदाकाराचे दर कमी असलेबाबत दिसुन येत आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेस बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे कामी एकुण रक्कम रू.३,६७,००,०००/- खर्च असे संपुर्ण कार्यवाहीस अपेक्षित आहे. त्याप्रमाणे प्राप्त लघुत्तम दराच्या प्राप्त दरानुसार येणा-या खर्चास व PH Jadhav, Pune यांना वाटाघाटी करणे मा. तांत्रिक छाननी समिती पुढे कार्यवाही करणेकामी बोलविणे उचित राहील.

तथापी सदर कामी मा.उपायुक्त (कर) तथा तांत्रिक छाननी समिती अध्यक्ष यांची वेळ व तारीख मिळणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी..

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर मा.आमदार श्री. संग्राम भैय्या जगताप यांनी निविदा क्र.२०३१ (Biomining) बाबत दि.२६/०६/२०१९ रोजी पत्र दिले आहे. सदरचे पत्र घनकचरा व्यवस्थापन विभागास दि.१/७/२०१९ रोजी प्राप्त आले आहे. निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये मुद्दा क्र.१० मध्ये संबंधित कंत्राटदार यांचेवर कुठल्याही प्रकारचे आक्षेप (कचरा डेपो हाताळणीवर) असु नये अशी अट आहे. सर्वात Lowest rate नमुद केलेले निविदाकार यांचे बाबत चौकशी चालु आहे. त्यानुसार संदर्भिय पत्रामध्ये सदर ठेकेदार यांचेवर आक्षेप असल्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरविणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मुख्य लेख परिक्षक यांचा अभिप्राय की, ई - निविदा क्र.२०३१ मधील अटी व शर्ती मधील अट क्र.९(१) (१०) प्रमाणे सील बंद तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधीत कंत्राटदार याच्यावर कुठल्याही प्रकराचे आक्षेप (कचरा डेपो हातळणे) असुनयेत याबाबत मा.आमदार संग्राम अरूणकाका जगताप वि.प. सदस्य यांचे पत्र क्र.१७२२ /१९ दि.२६/६/२०१९ नुसार आक्षेप पी.एच.जाधव यांची ई- निविदा अपात्र ठरविणेबाबत आक्षेप दिले असुन घनकचरा विभागाप्रमुख यांनी आक्षेपाप्रमाणे पी.एच.जाधव यांची ई- निविदा अपात्र ठरविणेबाबत अभिप्राय दिले असुन त्यानुसार उर्वरित दोन निविदा कराचे ही वरील अटी व शर्तीप्रमाणे आक्षेपाची विभागाने खात्री करून पुष्ठ क्र.T-३६ वरील घनकचरा व्यव. प्रमुख व मा.मुलेअ यांच्या अभिप्रयाप्रमाणे अ बाबत उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मजिप्राने Rerise तांत्रिक मंजूरी घेणेबाबत सूचित केले आहे असे समजते त्यानुसार Rerise दर हे DPR नुसार आहे की त्यामध्ये दर कमी होणार आहेत किंवा कसे याबाबत माहिती घेवून सादर करावे.

****

फेरसादर,

उपरोक्त विषयानुसार फेरसादर करण्यात येते की, मा.उपायुक्त (कर) यांच्या दिनांक ०९/०७/२०१९ रोजीच्या फेरसादर सुचनेनुसार अनुपालन सादर करण्यात येते की, सदर कामी ई -निविदा प्रसिध्दी कामी दिनांक २१/०२/२०१९ रोजी प्रस्तावीत करण्यात आले आहे. त्यानुसार सदरील कार्यवाही मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी दिनांक ०४/०३/२०१९ रोजी मंजुरी दिली आहे. सदरील निविदेतील दर हे शासन परिपत्रक क्रमांक:स्वमअ२०१८ /प्र.क्र.३५५ /नवि-३४ हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,४ था मजला, मंत्रालय, मुंबई दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजीच्या प्राप्त डिपीआर मंजुरी मधील दरानुसार ई -निविदा प्रस्तावीत करण्यात आली आहे. तसेच मा. महाराष्ट्र जीवन प्राधिकारण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्या दिनांक जुलै२०१८ च्या तांत्रिक मंजुरीनुसार बायोमायनिंग द्वारे १ लक्ष CUM साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी येणा-या खर्च अंदाजे रक्कम रूपये ४,६४,७०,०००/- च्या खर्चास मंजुरी दिली आहे. मात्र ज्या वेळेस आपल्या महानगरपालिकेचे डिपीआर मंजुर झाले त्यावेळे नवीन दरानेच आपल्यास शासनाची मंजुरी मिळाली आहे. मात्र मा.शासनाकडून नेमण्यात आलेल्या Eco Pro Environmental Services,lndore-१ (M.P.) यांच्या सोबत जोडलेल्या दिनांक १ जुलै २०१९ रोजी मेल द्वारे प्राप्त Recapitulation Sheet नुसार त्यांनी आपल्या मा.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , नाशिक यांची बायोमॅनिंग बाबत नव्याने मंजुर झालेले दर रक्कम रू. ४,२५,००,०००/- ला मंजुरी घेणेबाबत कळविले होते. तसेच दिनांक १ मे २०१९ रोजी प्राप्त सोबत

जोडलेल्या मेल नुसार नव्याने तांत्रिक मंजुरी घेणे बायोमायनिंग द्वारे १ लक्ष CUM साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी येणा-या खर्च रक्कम रू.४,२५,००,०००/- दराबाबत मंजुरी घेणेकामी मेल प्राप्त आहे.

त्यानुसार आपण प्रसिध्द केलेली ई-निविदा ही नव्याने प्राप्त दरानुसारच प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापी मंजुरीस्तव व पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा फेरसादर असे.

यावर मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी..

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, Reised Rate ने च तांत्रिक मान्यता मिळाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येते तसेच T-४ तत्कालीन आयुक्त तथा मा.जिल्हाधिकारी यांनीही त्यानुसारच अभिप्राय दिले आहेत त्यामुळे पुनश्च तांत्रिक मान्यता घेणेची आवश्यकता नाही. तसेच NGT चे आदेश व कच-याचा प्रश्न निकाली काढणे आवश्यक असल्यामुळे तसेच T-३६ व T३७ वरील विभाग प्रमुख व मु.ले.प. यांचे अभिप्राय अवलोकनार्थ घेता प्राप्त L-१ निविदाधारकास निविदेमधील अटी शर्तीनुसार अपात्र करून L-२ ला वाटाघाटीसाठी बोलावून L-१ चे दरास काम करणेबाबत वाटाघाटी करणे तसेच त्याने नकार दिला तर L-३ ला वाटाघाटी बोलावून तो तयार असलेस ठिक अन्यथा जो त्यांचेदरापेक्षा सर्वात कमी दरास काम तयार करणेस तयार असेल तर त्याला कामाचे आदेश देणे उचित होईल. उपरोक्त कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

****

संदर्भ- १. मा.आमदार श्री. संग्राम जगताप यांचे दिनांक २६/०६/२०१९ चे पत्र
२. मा.आमदार श्री. संग्राम जगताप यांचे दिनांक १०/०९/२०१९ चे पत्र

फेरसादर ,

उपरोक्त विषयाबाबत फेरसादर करण्यात येते की, बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणेकामी ई - निविदा क्र.२०३१ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेमध्ये प्राप्त निविदाकारांपैकी सर्वात कमी दर पी.एच. जाधव, पुणे या एजन्सीचे प्राप्त आहेत.

निविदेमधील अटी व शर्ती पृष्ठ क्रमांक २०१ मध्ये संबंधित कंत्राटदारावर कुठल्याही प्रकारचे आक्षेप (कचरा डेपो हाताळणीवर) असू नये असे नमूद करण्यात आले आहे. सदर बाबत पी.एच.जाधव, पुणे या एजन्सीचे सावेडी व बुरूडगांव येथील खत प्रकल्पाबाबत मा.आमदार श्री. शिवाजीराव कर्डीले यांनी नगरविकास विभागाकडेस तक्रार केली आहे. याबाबत नगरविकास विभागामार्फत चौकशी सुरू आहे.

सदर बाबत मा.आमदार श्री. संग्राम जगताप यांनी संदर्भ क्र.१ अन्वये मनपाकडेस पत्र देवून पी.एच.जाधव , पुणे या एजन्सीवर आक्षेप असल्याने त्यांची निविदा अप्राप्त ठरवून ई - निविदा प्रक्रिया पुर्ण करावी असे पत्रामध्ये नमूद केले आहे. तदनंतर संदर्भ क्र.२ अन्वये सदर प्रकरणी पुन्हा पत्र दिले आहे . सदर पत्रामध्ये सदरचा प्रकल्प लवकर सुरू होणे गरजेचे आहे व निविदा प्रक्रिया बाबत खात्री करून नियमानुसार कार्यवाही करावी असे पत्रात नमुद केले आहे.

त्यानुसार बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी साठवणूक करण्यात आलेल्या १ लक्ष मे.टन जुन्या कच-याचे बायोमायनिंग करणे बाबत प्राप्त झालेल्या निविदा बाबत निर्णय घेणेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रकल्प विभाग प्रमुख यांचा फेरसादर असे.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक याचां अभिप्राय की, प्रकल्प विभाग प्रमुख यांची दि.१७/९/२०१९ च्या ई - निविदा क्र.२०३१ या संदर्भात मा. आमदार श्री. संग्राम अरूणकाका जगताप यांचे पत्र क्र.१९४२/१९ दि.१०/९/२०१९ या पत्रावर प्रकल्प अधिकारी यांनी स्वंयस्पष्ट अभिप्राय नोंदविले नाहीत प्रकल्प अधिकारी यांचे

दि.२८/६/२०१९ पुष्ठ क्र.T-३६ वरील अभिप्रायाचे अवलोकन करून पुष्ठ क्र.T-३७ वर मु.ले.प. यांनी स्वंयस्पष्ट अभिप्राय दिले आहेत यांचे अवलोकन करावे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, कृपया T-३६ वरील SWM incharge व T-३७ वरील मु.ले.पे. यांचे अभिप्राय अवलोकनार्थ घ्यावेत तसेच त्यानुसार इकडील अभिप्रायानुसार T-३० कडील अभिप्रायानुसार L-१ निविदा धारकास अपात्र करून L-२ व वाटाघाटीचे करून ते L-१ चे दरामध्ये काम करणेस तयार असलेस त्यांना किंवा L-२ ने नकार दिला तर L-३ यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली होती. तथापी मा.आमदार कर्डीले यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार L-१ चे ठेकेदाराची शासन स्तरावर चौकशी सुरू असून ते प्रकरण अद्यापपर्यंत निकाली निघालेली नाही. तसेच T-४१ वरील "अ" मध्ये नमूद केलेनुसार मा.आमदार संग्राम जगताप यांनी दुस-यांदा दिलेल्या पत्रामध्ये निविदा प्रक्रियेबाबत खात्री करून नियमानुसार कार्यवाही करणेबाबत पत्र दिले आहे. उपरोक्त वस्तुस्थिती अवलोकनार्थ घेता L-१ बाबत शासन स्तरावर चौकशी सुरू असल्यामुळे T-३६ वरील SWM incharge व T-३७ वरील मु.ले.प. यांचे अभिप्राय व T-३९ वरील इकडील अभिप्रायानुसार निर्णयास्तव व पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, १] निविदेला एकमेव आक्षेत्र आमदार संग्राम जगताप यांच्या पत्रानुसार होता. त्याबाबत आमदार श्री. संग्राम जगताप यांनी खुलासा केला आहे. २] मा.आ.शिवाजी कर्डीले यांच्या तक्रारीच्या विषय वेगळा आहे. त्यामुळे L-१ निविदाधारकास काम देण्यास हरकत नाही.
सविस्तर टिपण्णीसह मा.स्थायी समिती मध्ये ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.सौ.दिपाली बारस्कर :- शहरामध्ये जो कचरा गोळा केला जातो तो कचरा डेपो मध्ये टाकला जातो का?सावेडी कचरा डेपो कडे जाण्या-या रस्त्याच्या मध्येच दोन दिवसांपासून कचरा टाकल्या जातो.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- मागील ठेकेदार संस्थेकडे विचारणा केली असता कचरा डेपोकडे जाणारा रस्ता सततच्या पावसामुळे चिखलमय झाल्याने गाडीचे चाके फसतात.त्यामुळे डेपोच्या कडेला कचरा टाकल्याचे दिसते.या दोन दिवसांमध्ये संपुर्ण कचरा उचलला नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- याप्रकल्प प्रक्रीयेच्या दरम्यान मा.आ.शिवाजीराव कर्डीले व मा.आ.संग्राम जगताप यांनी पत्रे दिली होती याबाबत माहिती सांगा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- मा.आमदार श्री. शिवाजीराव कर्डीले यांनी नगरविकास विभागाकडेस कंत्राटदारावर कुठल्याही प्रकारचे आक्षेप (कचरा डेपो हाताळणीवर) असू नये अशी तक्रार केली आहे. याबाबत मा.आयुक्त साहेब यांनी मा.शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे.मा.आमदार श्री. संग्राम जगताप यांनी मनपाकडेस पत्र देवून पी.एच.जाधव , पुणे या एजन्सीवर आक्षेप असल्याने त्यांची निविदा अप्राप्त ठरवून ई - निविदा प्रक्रिया पुर्ण करावी असे पत्रामध्ये नमूद केले आहे. तदनंतर सदर प्रकरणी पुन्हा पत्र दिले आहे . सदर पत्रामध्ये सदरचा प्रकल्प लवकर सुरू होणे गरजेचे आहे व निविदा प्रक्रिया बाबत खात्री करून नियमानुसार कार्यवाही करावी असे पत्रात नमुद केले आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- प्रकल्पा बाबत सविस्तर माहिती सांगा

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- बुरूडगांव कचरा डेपो येथे वर्षानुवर्ष पडुन असलेला कचरा जुना झालेला असुन त्याचे खता योग्य झालेला आहे.या कच-या मध्ये मोठयाप्रमाणात काचा,दगड गोटे,प्लॅस्टीक मिस्त्रीत असल्याने शेतकरी या खताची मागणी करत नाही.व घेत नाहीत.तसेच वर्षानुवर्ष कुजलेला कचरा जागा मोठया प्रमाणात व्यापली गेली असल्याने प्रक्रिया झाल्यावर जागा मोकळी होणार आहे.सध्या आपण बायोमायनिंग द्वारे

१ लक्ष CUM साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणार आहोत.

मा.श्री.गणेश भोसले :- जुन्या कच-यावर शहरातील निर्माण होणारा व गोळा केलेला कचरा टाकल्यास या प्रकल्पाचा कोणताही उपयोग होणार नाही.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- ठेकेदार संस्थेस आपण तश्या सक्त सुचना दिल्या असून जुन्या कच-यावर नविन कचरा पडणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.तसेच नविन गोळा होणा-या कच-या करिता कचराडेपोचे क्षेत्र मोठे असल्याने वेगळया जागेत नविन कचरा टाकण्यात येईल.

मा.श्री.सुभाष लोंढे :- किती जणांनी निविदा भरल्या होत्या.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- पी.एच.जाधव,पुणे Debrisolvw Private Limited, Gujarat, Meera Cleanfuels Limited ,Mumbai मा. तांत्रिक समिती समोर कागदपत्रांची छाननी कामी ठेवण्यात येवुन त्यापैकी पाच निविदाकार पैकी दोन निविदाकार यांचे कागदपत्रे अपुर्ण असलेल्या दोन निविदा अपात्र ठरले असुन पाच पैकी तीन निविदाकार यांचे दरपत्रक उघडण्यात आलेले आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ई निविदेची माहिती सांगा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त निविदतील तांत्रिक लिफाफा उघडण्यात येवुन दिनांक ०६/०६/२०१९ रोजी व दिनांक २१/०६/२०१९ रोजी मा. तांत्रिक समिती समोर कागदपत्रांची छाननी कामी ठेवण्यात येवुन त्यापैकी पाच निविदाकार पैकी दोन निविदाकार यांचे कागदपत्रे अपुर्ण असलेल्या दोन निविदा अपात्र ठरले असुन पाच पैकी तीन निविदाकार यांचे दरपत्रक उघडण्यात आलेले आहे.बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे कामाकरीता तुलनात्मक दृष्टया PH Jadhav, Pune या निविदाकाराचे दर कमी असल्याने हि निविदा मान्यतेकरीता स्थायी समिती पुढे सादर करण्यात आली आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट नुसार ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त झालेल्या निविदेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मनोज कोतकर :- बुरूडगांव मनपा कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे कामाकरीता तुलनात्मक दृष्टया PH Jadhav, Pune या निविदाकाराचे दर कमी असल्याने व मा.आयुक्त साहेब यांनी सुध्दा अभिप्राय दिलेला असल्याने निविदा मान्य करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त निविदतील बायोमायनिंग प्रक्रिया करणे कामाकरीता तुलनात्मक दृष्टया PH Jadhav, Pune या निविदाकार यांचे १ लक्ष घन मीटर कच-याकरीता प्रक्रिया करीता रक्कम रू.३,६७,००,०००/- हे कमी असल्याने व मा.आयुक्त साहेब यांच्या अभिप्रायानुसार निविदा मंजूर करण्यात येत आहे.

<u>**ठराव :-**</u> ऑफिस रिपोर्ट नुसार ई- निविदा क्र.२०३१ घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरी नुसार मा. शासनाने तयार करून दिलेल्या डिपीआर नुसार बुरूडगांव स.नं. ३४ येथील मनपा कचरा डेपो येथे साठलेल्या कच-यावर बायोमायनिंग द्वारे प्रक्रिया करणे करीता प्राप्त निविदतील बायोमायनिंग प्रक्रिया करणे कामाकरीता तुलनात्मक दृष्टया PH Jadhav, Pune या निविदाकार यांचे १ लक्ष घन मीटर कच-याकरीता प्रक्रिया करीता रक्कम रू.३,६७,००,०००/- हि नमुद केलेली रक्कम तुलनात्मक दृष्या सर्वात कमी असल्याने व मा.आयुक्त साहेब यांच्या अभिप्रायानुसार निविदा मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज कोतकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- १०९ बुधवार दि.१३/११/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सौ. रिता शैलेश भाकरे, नगरसेविका यांचे दि.२६/८/२०१९ रोजीचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा बोल्हेगाव व नागापूर या भागामध्ये बससेवा सुरू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटर व्हेईकल विभाग

संदर्भ- सौ. रिता शैलेश भाकरे, नगरसेविका (प्र.क्र.७ ), अ.नगर मनपा यांचे पत्र दि.२६/८/२०१९

उपरोक्त संदर्भ व विषयानुसार विनंती पुर्वक सादर करणेत येते की, बोल्हेगांव व नागापुर या भागात एम.आय.डी.सी. मधील कामगार व विद्यार्थी नागरिकांची व मजुर वर्ग मोठया प्रमाणात असुन त्यांची प्रवासाची गैरसोय होत असुन त्यांचे सेवेसाठी बोल्हेगांव व नागापुर भागामध्ये बससेवा चालू करणे बाबत संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे.

सद्यस्थितीत शहर बससेवा मंजुर ९ मार्गावर कार्यरत असुन यापुर्वी प्राप्त मा.नगरसेवकांचे मागणी पत्राप्रमाणे बससेवेचे नवीन मार्ग सुरू करणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत आलेला आहे. महानगरपालिकेमध्ये परिवहन समिती अस्तित्वात नसल्याने बससेवेचे आवश्यक निर्णय सक्षम मा.स्थायी समितीमध्ये घेतले जातात. याप्रमाणे उक्त मार्ग सुरू करणेकामी मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सदर मार्ग मंजुरीसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेकामी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे लिपिक , मोटार व्हेईकल यांचा अहवाल असे.

यावर मेकॅ.इंजि. यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी..

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.सौ. रिता शैलेश भाकरे, नगरसेविका यांचे दि.२६/८/२०१९ रोजीचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा बोल्हेगाव व नागापूर या भागामध्ये बससेवा सुरू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.कुमार वाकळे :- बोल्हेगांव येथे बस सेवा सुरू करणे करीता मी व इतर नगरसेवकांनी दिलेल्या प्रस्तावास दिनांक १९/०८/२०१९ रोजीच्या सभेमध्ये मान्यता दिलेली आहे.

मा.सभापती साहेब :- आधीच्या सभेमध्ये मार्गास मान्यता दिलेली आहे.

मेकॅ.इंजी.श्री.निकम :- मा.नगरसेवीका श्रीमती रिता शैलेश भाकरे यांनी दिलेल्या पत्रानुसार प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- यापुर्वीच्या सभेमध्ये बोल्हेगांव येथील मार्गास मान्यता दिली आहे..त्यानुसार प्रशासकीय कार्यवाही चालू आहे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/८/२०१९ रोजीच्या सभेमध्ये बोल्हेगांव येथील मार्गास मान्यता दिलेली असून त्यावर प्रशासकीय कार्यवाही चालू आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा बोल्हेगाव व नागापूर या भागामध्ये बससेवा सुरू करणेबाबतच्या ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** बोल्हेगांव भागामध्ये बससेवा सुरू करणे बाबत मा.श्री.कुमार वाकळे व इतर नगरसेवकांनी दिलेल्या पत्रा नुसार दिनांक १९/८/२०१९ रोजीच्या सभेमध्ये बोल्हेगांव भागामध्ये नविन मार्गावर बससेवा सुरू करणे बाबत मान्यता दिलेली आहे.त्युानसार प्रशासकिय कार्यवाही चालू आहे. ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये बोल्हेगाव व नागापूर या भागामध्ये बससेवा सुरू करणेबाबतच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभपती
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५**

विषय क्रमांक- ११० बुधवार दि.१३/११/२०१९

---

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. कैलास प्रभाकर मडके, सहाय्यक ग्रंथपाल यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणेबाबत.

प्रति,

मा.सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**विषय :-** श्री. कैलास प्रभाकर मडके, सहाय्यक ग्रंथपाल यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** श्री.कैलास प्रभाकर मडके,सहाय्यक ग्रंथपाल यांचा दिनांक २२/०७/२०१९ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरून प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्री.कैलास प्रभाकर मडके,साहाय्यक ग्रंथपाल यांनी अर्ज देवून शिस्तभंग कारवाई प्रकरणी आरोपपत्र क्रमांक १०६२ दि.१७/३/२००८ अन्वये माझेवर आरोपपत्र भेरणेत येवून विभागीय चौकशी करणेत आलेली आहे.

